30 JANTO 05 FEB 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 1/28/2023 9:11 PM Page 1

C M Y K

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ | अंक : ६ | मंगळवार दि. ३० जानेवारी २०२३ ते रविवार दि. ०५ फेब्रुवारी २०२३ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## जमिनीच्या वाटणीचा वाद भयंकर पेटला भावानेच सख्ख्या भावाचा जीव घेतला


बेळगावी/क्राईम रिपोर्टर



पैसा, जमीन जायदाद, धन संपत्ती खूप वाईट असते. कारण त्यावरून वाद होतात आणि या वादात माणूस रक्ताच्या नात्याचा सुद्धा विचार करीत नाही. ग्रामीण भागात जमिनीच्या वादातून अशा घटना जास्त घडतात. बेळगाव जिल्ह्यातील बेकवाड येथे अशाच एका घटनेत जमिनीच्या वादातून मोठ्या भावाने त्याच्या पत्नीच्या मदतीने लहान भावाची हत्या केली. ...पान २ वर

## नात्यातीलच प्रेमसंबंधाने कुटुंबाची मती 'सैराट' झाली मुलीला जमिनीत गाडून त्यावर कांद्याची लागवड केली

नांदेड/पी.डी.पाटोळे



समाजात कालानुरूप बदल होत असतो आणि माणूस हा समाजाचा एक घटक असल्याने त्यानेही बदलत्या काळानुसार बदलायला हवे. जुन्या चालीरीती, रूढी परंपरा आणि त्यातून निर्माण झालेली पाप-पुण्याची खुळचट कल्पना या सगळ्या गोष्टी आता मागे पडत चालल्या आहेत. कारण हे विज्ञान युग आहे आणि विज्ञान युगातील माणूस हा सुशिक्षित असल्याने तो स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास तो सक्षम असतो. अशावेळी समाजाच्या धाकाची त्याला अजिबात भीती नसते. पण काही लोक आजही जुन्या चालीरीती आणि बुरसटलेल्या विचारांना कवटाळून बसलेले आहेत आणि त्यातूनच त्यांच्या मनात समाजाविषयी भीती निर्माण झालेली असते. अशावेळी आपण किंवा आपल्या मुलाबाळांनी काही चुकीचे केले तर समाजात आपल्याला तोंड दाखवायला जागा राहणार नाही, आपली समाजात बदनामी होईल? समाज आपल्यावर बहिष्कार टाकील, अशी त्यांना भीती असते. त्यातच जात पंचायतींची दहशत असते. जर एखाद्या मुलाने किंवा मुलीने जातीच्या बाहेर जावून प्रेमविवाह केला तर त्याचे परिणाम त्या मुलामुलीच्या कुटुंबियांना भोगावे लागतात आणि त्यातूनच सैराट सारख्या ऑनर किलिंगच्या घटना घडतात. पण आज कालची सुशिक्षित मुले आई-वडील किंवा समाज कशाचीच परवा करीत नाहीत, पण त्याची त्यांना फार मोठी किंमत चुकवावी लागते. कारण रक्ताच्या नात्यातलीच माणसे खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी आपल्याच मुलांच्या जीवावर उठतात.





नांदेड जिल्ह्याच्या पिंपरी महिपाल गावात बीएचएमएसचे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणीचे गावातीलच त्यांच्या नात्यातल्या एका तरुणाशी प्रेम संबंध होते. पण तिच्या कुटुंबियांना ते मान्य नव्हते. म्हणून त्यांनी तिचे दुसऱ्या मुलाशी लग्न जुळवले, पण या प्रेमसंबंधामुळे लग्न मोडले. त्यामुळे आता आपली समाजात बदनामी होणार या भीतीपोटी त्यांनी मुलीला जाळून शेतात पुरले. मात्र ती बेपत्ता झाल्याने तिच्या मैत्रीणीना संशय आला आणि त्यांनी थेट जिल्हा पोलीस मुख्यालयातील महिला सुरक्षा अधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी केली आणि त्यानंतर या खुनाला वाचा फुटली आणि मुलीच्या वडिलांसह ५ जणांना अटक करण्यात आली.

नांदेड जिल्ह्याच्या लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपरी महिपाल येथे राहणारी व वैद्यकीय शिक्षण घेणारी शुभांगी जोगदंड हि तरुणी २२ जानेवारी पासून बेपत्ता झाली होती. तिचा मोबाईल स्वीच ऑफ होता. घरच्यांनी तसेच तिच्या मित्र मैत्रिणींनी शोधण्याचा प्रयत्न केला, पण ती सापडली नाही. तेंव्हा तिच्या मैत्रीणींना संशय आला. आणि त्यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय गाठून या बाबतची माहिती थेट पोलीस दक्षता अधिकाऱ्यांना दिली. त्यामुळे त्यांनी तत्काळ लिंबगाव पोलिसांना शुभांगी जोगदंड हिचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी शोध घेण्यास सुरूवात केली. गावात जाऊन माहिती काढली. तसेच खबरींना कामाला लावले आणि त्यातून एक भयंकर माहिती उजेडात आली. जोगदंड यांच्या शेतात काहीतरी जळलेले पुरण्यात आलेले आहे आणि त्यावर कांद्याची लागवड करण्यात आली आहे. हि माहिती मिळताच पोलिसांनी शुभांगीच्या वडिलांना ताब्यात घेतले आणि त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी आपल्या ...पान २ वर

## प्रेमाच्या त्रिकोणात 'लव्ह स्टोरी'चा शेवट झाला तिचा एक प्रियकर मेला तर दुसरा तुरुंगात गेला





मयत प्रमोद निकाळजे

नाशिक/क्राईम रिपोर्टर

**एकाच म्यानात जशा दोन तलवारी राहू शकत नाही. तसेच एकाच महिलेवर दोघांचे प्रेम असले तरी हा प्रेमाचा त्रिकोण कधी कधी मृत्यूचा सापळा बनतो. ओझर गावातील जयेश आणि प्रमोद या दोघांचे एकाच महिलेवर प्रेम होते. सुरुवातीला दोघांनाही त्याची कल्पना नव्हती. पण जेंव्हा समजले तेंव्हा त्यांच्यात एकमेकांविषयी सुडाची भावना निर्माण झाली आणि एके दिवशी मित्राच्या मदतीने जयेशने प्रमोदचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.**

बाई, बाटली आणि संपत्ती हे वादाचे आणि गुन्ह्याचे प्रमुख कारण असल्याचे म्हटले जाते. नाशिक जिल्ह्यात काही दिवसांपुर्वी बाईच्या नादातून एका तरुणाची हत्या उघडकीस आली. एकाच महिलेवर दोघा तरुणांचे प्रेम असल्यामुळे दोघा तरुणांमधे धुसफुस सुरु होती. त्यातून एका तरुणाने मित्राच्या मदतीने दुसऱ्याची हत्या केली. आता ती महिला केवळ आपलीच होणार असे समजून हत्या करणारा तरुण निर्धास्त झाला होता. मात्र गुन्हा उघडकीस आला आणि जेलमधे जाण्याची त्याच्यावर वेळ आली. नाशिक जिल्ह्याच्या ओझर गावातील आंबेडकर नगरात प्रमोद दत्तू निकाळजे हा आई, भाऊ, भावजय यांच्यासमवेत एकत्रित कुटुंबात रहात होता. मजुरी आणि बदली ड्रायव्हर म्हणून तो काम करत होता. त्याच गावात जयेश भंडारे हा तरूणही रहात होता. दोघेही तरूण होते. एकाच गावात रहाणारे होते. या दोघांचे एकाच महिलेवर प्रेम जडले होते. ती बाई त्या गावातच रहात होती.

चार-चौघात उठून दिसणारी ती बाई प्रमोद आणि जयेश दोघांच्याही मनात भरली होती. दोघेही तिच्यावर प्रेम करत होते. तिने दोघांनाही होकार दिला होता. ती दोघांनाही खेळवत असली तरी त्यांना त्याचा पत्ता नव्हता. काही दिवसांनी तिच्याशी असलेल्या संबंधाची एकमेकांना माहिती झाली. त्यामुळे दोघात वैर निर्माण झाले आणि झुंज सुरु झाली आपल्या प्रेमसंबंधात दुसऱ्याच अडसर होत आहे अशी दोघांचीही भावना झाली होती, त्यामुळे एकमेकाचा काटा काढण्याचा दोघे विचार करु लागले. त्यातूनच त्यांच्यात वादावादी होत होती. त्यातूनच जयेश भंडारे याने त्याचा काटा काढण्याचे ठरवले. हा अडसर दूर करण्यासाठी जयेशने त्याचा मित्र संदीप बनसोडे याची मदत घेतली. ...पान २ वर

## कलियुगात हे असे कसे झाले सुग्रीवाने रामालाच ठार केले



लातूर/आंबादास करकरे

व्यावसायिक भागीदारीत पार्टनरला कधीच घरापर्यंत आणायचे नसते. कारण काही लोक नियत खराब असतात. बोट धरायला दिला तर हात कधी पकडतील याचा नेम नसतो. लातूर येथील अशाच एका घटनेत सुग्रीव आणि राम या दोन मित्रांनी दोन मित्रांनी ट्रान्सपोर्टचा धंदा सुरु केला. त्यामुळे राम सुगरीवच्या घरी येऊ लागला. त्यातून त्याचे सुग्रीवच्या पत्नीशी सूत जुळले. दोघेही फोनवर तासंतास बोलू लागले. मात्र हा प्रकार सुग्रीवच्या लक्षात येताच तो भयंकर चिडला आणि एका दिवशी त्याने रागाच्या भरात रामची हत्या केली आणि स्वतःच पोलिसांसमोर हजर झाला.





आरोपी सुग्रीव

लातूर शहरातील विवेकानंद पोलिस ठाण्यात सुग्रीव अप्पाराव कावळे (वय ३२ वर्ष, व्यवसाय ड्रायव्हर,रा. ब्रम्हवाडी ता.चाकूर जि.लातूर) हा इसम घाबरलेल्या आवस्थेत पोलिस ठाण्यात हाजर झाला. त्याच्या चेहऱ्यावर काहीस तणाव दिसत आसल्याचे ठाणे अंमलदारांने हेरले. त्याला पोलिस ठाण्यात काय काम आहे असे दरडावून विचारले असता, त्यांने पोलिसांना मी माझ्या मित्राचा खून करून त्याचे प्रेत मांजरा नदीत फे कून दिल्याचे धक्कादायक माहीती दिली. ठाणे अंमलदारांनी घटनेचे गांर्भिय ओळखून वरीष्ठांना खबर दिली. विवेकानंद पोलिस ठाण्याचे ...पान २ वर

## अखेर सव्वा वर्षांनी खुनाचा गुंता सुटला जीवनरक्षकच सदिच्छाच्या जीवावर उठला

पालघर/एस.कुमार

**कोणत्याही माणसाने अनोळखी इसमावर कधीही विश्वास ठेऊ नये. पण आजकालच्या मुली सहज कोणावरही विश्वास ठेवतात आणि फसतात. जे.जे. ग्रॅन्ट मेडिकल महाविद्यालयात एमबीबीएस करून डॉक्टर होण्याची स्वप्न रंगवणाऱ्या सदिच्छा साने हिच्या बाबतीत असेच घडले. बांद्र्याच्या बॅन्डस्टॅन्डवर जीवरक्षक म्हणून काम करणाऱ्या एका इसमाशी तिची ओळख झाली. तिने त्याच्यावर विश्वास टाकला आणि त्यानेच मित्राच्या मदतीने तिचा खून केला. पण तब्बल सव्वा वर्षाच्या तपासानंतर या खुनाला वाचा फुटली आणि पोलिसांनी आरोपींना अटक केली.**





आरोपी मिथू सिंह

पालघर येथील रहिवासी असलेली सदिच्छा साने ही दक्षिण मुंबई येथील जे.जे.ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एमबीबीएसच्या तिसऱ्या वर्षात शिकत होती. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी ती परीक्षेसाठी जाते म्हणून घरातून बाहेर पडली. त्यानंतर ती घरी परतलीच नाही. सदिच्छा हिचा शोध कुठेच लागत नसल्याने तिच्या कुटुंबियांनी बोईसर पोलिस ठाण्यात तक्रार केली. सदिच्छा बेपत्ता होऊन १५ दिवस उलटल्यानंतरही जेव्हा तिच्याशी संपर्क होऊ शकला नाही, तेव्हा कुटुंबीयांनी तिच्या अपहरणाचा संशय व्यक्त केला होता. दरम्यान जे.जे. मध्ये परीक्षेस जाते म्हणून सदिच्छा घराबाहेर पडल्याने जे. जे. मार्ग पोलिसांनी देखील तिचा शोध घेतला. तिचा काहीच ठावठिकाणा लागला नाही. सदिच्छाचा शोध घेण्यासाठी सोशल मीडियासह बँड स्टॅन्ड, बस स्थानकासह वांद्रे परिसरात अनेक ठिकाणी तिचे फोटो लावण्यात ...पान ६ वर

## मुलाच्या मृत्यूमुळे 'तो' सुडाने पेटला चुलत भावासह ७ जणांचा जीव घेतला

पुणे/एन.आर.पाटोळे

**माणसाच्या रागाला डोळे नसतात आणि सुडाची भावना एकदा का त्याच्या मनात निर्माण झाली कि मग तो नात्यागोत्याचा अजिबात विचार करीत नाही. संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या निघोज येथील ७ जणांच्या हत्याकांडात असेच घडले. चुलत भावाच्या मुलासोबत गेलेला आपला मुलगा अपघातात गंभीर जखमी झाला याची माहिती चुलत भावाने लपवून ठेवली आणि नंतर मुलाचा मृत्यू झाल्यावर कळवली या गोष्टीचा निघोजमध्ये राहणाऱ्या अशोक पवार आणि त्यांच्या कुटुंबाला इतका राग होता कि याच रागातून त्यांनी मोहन पवार त्याची पत्नी, मुलगी, जावई आणि त्यांची मुले अशा ७ जणांची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी ५ आरोपींना अटक केली आहे.**





अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील निघोज गावात राहणाऱ्या पवार आणि फुलावरे कुटुंबातील महिला आणि पुरुषांचे टप्प्याटप्प्याने सहा दिवसात ७ मृतदेह दौंड तालुक्यातील पारगाव मधील भीमा नदी पात्रात आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. या सात हत्या चुलत भावानेच केल्या असल्याचे पोलीस तपासात ...पान २ वर

## ५०० रुपयांचा वाद अखेर प्राणावर बेतला गॅरेजवाल्याने कार मालकाचा जीव घेतला

जुन्नर/क्राईम रिपोर्टर



मयत संतोष

**स्वभावाने तापट असलेल्या माणसाच्या हातून कधी काय घडेल याचा नेम नाही. असाच काहीसा प्रकार मयूर सोमवंशी याच्या बाबतीत घडला. त्याच्या गॅरेजमध्ये संतोष गोडसे यांची क्रुझर कार सर्विसिंगसाठी आली होती. मायुरणे ती सर्विस करून दिली, पण त्या कारची व्यवस्थित सर्विसिंग झाली नाही असा कार मालकाचा आरोप होता. त्यामुळे त्याने ५०० रुपये कमी दिले. मात्र गॅरेज मालकाने हे ५०० रुपये कापून घेणार असे सांगताच मयूर आणि कारमालक यांच्यात ५०० रुपयांवरून वाद झाला आणि रागाच्या भरात मयुरने कार मालक गोडसे यांचा खून केला तसेच स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला पण तो बचावला.**

जुन्नर तालुक्यातील पिंपळवाडी येथील विनायक उर्फ संतोष बबन गोडसे हे टुरीस्ट व्यवसाय करीत होते.त्यासाठी ते क्रुझर गाडी वापरत होते.पिंपळवाडीत ते आपल्या पत्नी मुलासह रहायला असल्याने या परिसरात त्यांना बरेच लोक ओळखत होते. गेल्या महिनाभरा पूर्वी त्यांनी आपली क्रुझर गाडी क्र.एमएच.१४ डीटी ५३०८ ही दुरूस्तीसाठी हैदरभाई याच्या ...पान ६ वर

## प्रियकरासाठी तिचे मन अधीर झाले पत्नीने सुपारी देऊन पतीला ठार केले



मयत नितीन

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

**शरीरसुखाला चटावलेली चालू बाई कोणत्याही थरालाजाऊ शकते. पतीच्या अपरोक्ष दुसऱ्याशी विवाहबाह्य संबंध ठेवताना तिला कुणाचीही परवा नसते. कोल्हापूरच्या कसबा बावडा परिसरात राहणाऱ्या लीना पडवळे या विवाहितेचे ही रवी माने याच्याशी अनैतिक संबंध होते. मात्र नितीनला याची माहिती मिळताच तो लीनाला मारहाण करू लागला. त्यामुळे लीनाने प्रियकर रवी मानेच्या मदतीने पतीला मारण्यासाठी दीड लाखांची सुपारी दिली. त्यानंतर मारेकऱ्यांनी नितीनला गाठून त्याचे शीर धडावेगळे केले. अत्यंत निर्घुणपणे केलेल्या या हत्येने संपूर्ण कोल्हापूर हादरले होते. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने सर्व आरोपींना अटक केली.**



नितीन पडवळे हे पत्नी लीना पडवळे आणि मुलासह लाईन बाजार येथील कसबा बावडा परिसरात राहयला होते. त्याची पत्नी लीना ही बाहेरख्यालीपणाने वागत होती. ती तशी चालूच असल्याने तिचे सुत कावळा नाक्याजवळ माकडवाला वसाहतीत राहणाऱ्या रवी माने याच्याशी जुळले होते. ती नितीन याची दुसरी पत्नी होती.ती त्याच्याबरोबर गुलर्छेरे उडवित मौज मजा करीत असताना ही गोष्ट तिचा पती नितीन पडवळे याला समजली.त्या दोघांचे संबंध घटनेच्या अगोदर पाच वर्षापासून सुरू होते. त्याने तिला याबाबत विचारणा केली असता ती त्याला त्यावेळी स्पष्ट शब्दात सांगितले की, माझे रवीवर प्रेम असून मी त्याचे बरोबरच राहणार आहे. नितीन ...पान ६ वर

C M Y K

30 JANTO 05 FEB 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 1/28/2023 9:12 PM Page 1



पान १ वरून....

## जमिनीच्या वाटणीचा वाद भयंकर ...

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पती–पत्नीला अटक केली आहे. खानापूर जवळील बेकवाड येथील बाळेकोडल शेतवाडीत यल्लाप्पा गुरव आणि त्याचा भाऊ जक्काप्पा उर्फ राजु गुरव हे दोघेजण आपआपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. बाळेकोडल शेतशिवारात त्याचे वडिलार्जीत शेतजमीन असल्याने त्या शेतजमीनीत दोघेही आपआपली घरे बांधून तेथे राहत आहेत.त्याच्या वडिलार्जीत शेजमीनीची वाटणी तोंडी झाली असल्याने वाटणीला आलेल्या शेतीत ते दोघे ही राबून खात होते. त्यात जक्काप्पा ऊर्फ राजु याला जास्त हिश्याने जादा वाटणीची शेतजमीन गेली आहे कारण तो मोठा भाऊ असल्याने त्याने मुद्दामज जास्त हिस्सा घेतला आहे असा समज यल्लाप्पाला झाला होता.त्यामुळे तो सारखा दारू पिऊन येऊन मोठा भाऊ जक्काप्पाबरोबर वाद घालून भांडण काढत होता. बेकवाड हे गाव तुरळक लोकवस्तीचे असून ते दोघे राहत असलेले बाळकोडल शेतवस्ती ही गावापासून बरीच लांब आणि निर्मनुष्य होती. त्याच्या शेतवस्तीच्या बऱ्याच लांब अंतरावर दुसऱ्याची वस्ती होती. त्यामुळे त्याच्या घरात काय चालले आहे हे त्या लोकांना ही माहित नव्हते. पण त्यांना त्यांच्या भांडणातून दोघा भावात शेतजमीनीचा वाद चालू आहे एवढेच माहित होते. त्याचेत कधी भांडण किंवा हाणामारी झाली तरी त्यांना समजत नव्हते. यल्लाप्पाला दारू पिण्याचे व्यसन जास्त होते. तो दारू पिऊन आला की या वादात मोठया भावाला शिव्या देत बसत होता.मला माझ्या वाटणीची शेतजमीन कमी देवून तु जास्त घेतला आहेस ती जमीन माझ्या नावावर तर करून दे असा तगादा लावत होता.त्या दोघांची भांडणे हीं ही गेल्या दोन तीन वर्षापासून चालू होती. पै पाहुण्यांनी ही त्यांना वाद घालत बसू नका काय असेल तर आपसात मिटवून घ्या असा सल्ला दिला होता. पण तो सल्ला त्यांनी काही ऐकला नव्हता. मोठा भाऊ राजू याच्या मते आपण बरोबर हिश्याने वाटणी केली आहे तरी ही यल्लाप्पा हा मानत नाही त्यामुळे त्याला दिलेली जमीन मी कशी काय त्याच्या नावावर लावून देणार त्याच्या पैशाने त्याने ती जमीन त्याचे त्याने नावावर करून घेतली पाहिजे असे तो म्हणत होता. दोघाभावांची भांडणे चालली म्हणजे राजुजी बायको जयश्री ही नवऱ्याची बाजु घेऊन यल्लाप्पाला बोलत होती.ती तर भांडणात त्याला तू कुठे जातोस ते जा तुला नावावर काही करून देत नाही असे म्हणून त्याला डिवचत होती. यल्लाप्पाला दारूची नशा झाली की तो त्या दोघांच्या बरोबर या कारणातून भांडण काढत होता.याचा राग नवरा बायकोला येत होता. त्यातच यल्लाप्पाची बायको त्याच्याबरोबर भांडण काढून ती तिच्या माहेरी मुलासह राहत असल्याने राजु आणि त्याच्या बायकोला भांडायला चेव येत होता. भांडणाचे मुळ कारण सोडून ते दोघे त्याला तु दारू पिण्याचे सोड नीट वाग आणि तुझ्या बायको पोरांना घेऊन येत असे सांगत मुळ मुद्दा बाजुला सारत असल्याने यल्लाप्पा जास्त चिरडीला पडत होता. तो त्याला व त्याच्या बायकोला कसल्या वाटेल त्या शिव्या कन्नडमध्ये देत होता. त्यात मोठया भावाची बायको म्हणजे त्याची वहिणी भांडणात तेल ओतण्याचेच काम करीत होती. बुधवार दि.१८ रोजी संध्याकाळी ७ च्या सुमारास यल्लाप्पा हा दारू पिऊनच आला होता. शेतवडीत आल्या आल्या घराच्या बाहेरील कट्टयावर बसून तो मोठा भाऊ जक्कप्पा उर्फ राजू याला शिव्या देत होता. राजु हा त्याचे घरात आतील खोलीत टीव्ही बघत बसला होता. यल्लाप्पा हा दारू पिऊन शिव्या देत असतो हे त्याला माहित होते.बराच वेळ तो शिव्या देत होता. त्याचे ऐकून घेऊन जक्काप्पा हा येन आणती वो मगन्ना असे कन्नडमध्ये बोलत बाहेर आला येताना त्याने आपल्या हातात मोठी काठी आणली होती. त्या काठीने तो त्याला मारहाण करू लागल्यावर दारूच्या नशेत असणाऱ्या यल्लाप्पाने ही बाजुलाच पडलेली काठी घेऊन त्याच्या डोक्यात हाणली. त्यासरशी जक्काप्पा हा ओरडत खाली पडला त्याची बायको जयश्री ही ओरडत बाहेर आली येताना तिने बरोबर चटणी पुड आणि कोयता आणला होता. तिने चटणी पूड यल्लाप्पाच्या डोळ्यात फुंकली तसा तो डोळे चोळत खाली पडला. तिने आणलेला कोयता नवरा जक्काप्पाकडे दिल्यावर त्याने त्याच कोयत्याने यल्लाप्पाच्या डोक्यावर मानेवर जोरदार वार केले. तो रक्ताच्या थारोळ्यात ओरडत निपचिप पडला.त्याच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करीत ते नवरा बायको आपल्या घरात गेले आणि दरवाजा बंद करून घेतला. तो जिंवत आहे की नाही याची त्यांनी जराही चिंता केली नाही. आजुबाजुला कुणीच नसल्याने त्याच्यात झालेली हाणामारी कोणाच्याच लक्षात आली नाही. या मारहाणीत यल्लाप्पाच्या डोक्यावर मानेवर जबर मारहाण झाल्याने त्याचा जागीच मृत्यु झाला. हल्ली थंडीचे दिवस असल्याने तो ज्या ठिकाणी मरून पडला होता.त्या जागेवरील रक्त देखील गोठले होते. दुसऱ्या दिवशी ही घटना बाजुला असणाऱ्या शेतकऱ्यांना समजल्यावर त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन या घटनेची माहिती गावातील लोकांना आणि खानापूर पोलीसांना दिली. घटनास्थळी खानापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मंजुनाथ नाईक, बैलहोंगलचे पोलीस उपाधिक्षक प्रवीण नाईक, नंदगडचे पोलीस उप निरीक्षक आर.एस.सपाटे यांनी भेट देवून पाहणी करून या घटनेची माहिती घेतली. खानापूर पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून तपासाला सुरूवात केली.ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची माहिती त्यांनी आजुबाजुच्या लोकाकडून घेतली. त्यानंतर त्यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी खानापूर येथील सरकारी दवाखान्यात पाठवून दिला. या घटनेची माहिती मयत यल्लाप्पाच्या पत्नीला पोलीसांनी दिल्यावर ती ही आपल्या माहेरहून आली. शेतजमीनीच्या वादातून ही घटना घडली असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी मयत यल्लाप्पा याचा मोठा भाऊ जक्काप्पा याचेकडे या घटनेची चौकशी करायला सुरूवात केली. तो ही या घटनेत गंभीर जखमी झाला असल्याने खानापूरच्या दवाखान्यात तो उपचार घेत होता. तेथील उपचारानंतर त्याला व त्याची पत्नी जयश्री यांना पोलीसांनी ताब्यात घेऊन या घटनेची त्यांनी माहिती घेतली. त्या दोघांना बोलते करायला पोलीसांना वेळ लागला नाही. त्यांनी ही कोणतेही आढेवेढे न घेता घडलेली संपूर्ण घटना पोलीसांना सांगून आपला गुन्हा कबुल केला. त्यांनी गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांनी मयत यल्लाप्पा गुरव याची पत्नी अस्मिता गुरव हिने दिली. तिने पोलीसांना सांगितले की तिचा पती यल्लाप्पा आणि मोठा दीर आणि भावजेय जयश्री याच्या बरोबर गेल्या दोन तीन वर्षापासून शेतजमीनीच्या हिश्यासाठी वाद सुरू आहेत. दीर आणि भावजेय हे दोघे हिश्याची वाटणी करून ते नावावर करून देत नव्हते. तिच्या फिर्यादीनुसार यल्लाप्पा शांताराम गुरव (वय ३५)याच्या खुन प्रकरणी त्याचा मोठा भाऊ जक्काप्पा शांताराम गुरव (वय ४०) त्याची पत्नी जयश्री जक्काप्पा उर्फ राजु गुरव (वय ३८) याच्यां विरोधात आयपीसी कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्या दोघांनी रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. दरम्यान पोलीसांनी जक्काप्पा आणि त्याची पत्नी जयश्री याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता व काठी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास खानापूर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. शेतजमीनीच्या वादा सख्खा भाऊच वैरी बनत असतो हे बऱ्याच घटनेवरून दिसून आले आहे.

## नात्यातीलच प्रेमसंबंधाने कुटुंबाची...

नातेवाईकांच्या मदतीने शुभांगीची हत्या करून तिचा मृतदेह जाळून शेतात पुरल्याचे व त्यावर कांद्याची लागवड केल्याचे कबुल केले. त्यानंतर त्यांच्या शेतात खोदकाम करून जळालेला मृतदेह बाहेर काढण्यात आला आणि शुभांगीच्या हत्येप्रकरणी शुभांगीचे वडील जनार्दन जोगदंड, भाऊ केशव जोगदंड, मामा गिरधारी तसेच कृष्ण आणि गोविंद हे दोन चुलत भाऊ अशा ५ जणांना अटक केली आहे. कुटुंबाच्या खोट्या प्रतिष्ठेपायी तसेच समाजाच्या भीतीने भावी डॉक्टर असलेल्या एका उच्च शिक्षित मुलीची हत्या तिच्या कुटुंबियांनीच केल्याच्या या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे.

## प्रेमाच्या त्रिकोणात ‘लव्ह स्टोरी’चा शेवट...

रात्री दोन वाजण्याच्या सुमारास जयेश याने प्रमोद यास बोलावून घेतले. त्यानंतर आंबेडकरनगरातील बोळात संपत उघडे याच्या घराजवळ जयेश भंडारे व त्याचा मित्र संदीप बनसोडे या दोघांनी मिळून त्याच्यावर तलवारीने व चॉपरने वार करून त्याला ठार मारले. गुरूवार दि. १२ जानेवारी २०२३ रोजी सकाळी साडेसात वाजता प्रमोदचा भाऊ अशोक निकाळजे याला आंबेडकरनगर येथे रहाणाऱ्या मयुर सुतार याने फोन करून सांगितले की, ’तुझा भाऊ प्रमोद हा भानुदास ससाणे व संपत उघडे यांच्या घराच्या मध्ये असणाऱ्या बोळात रक्तबंबाळ होवून जखमी अवस्थेत पडलेला आहे. त्याच्या डोक्यास, तोंडास हातास मार लागलेला असून तुम्ही लवकर या.’ हा निरोप मिळताच अशोक आणि त्याच्या पत्नीने मोटरसायकलवरून ताबडतोब आंबेडकरनगर गाठले, तेंव्हा तेथे त्याची आई, भाऊ किशोर आणि इतर लोकांची गर्दी जमलेली होती. त्यावेळी त्याच्या आईने अशोकला सांगितले की, प्रमोद हा रात्री दोन वाजता ‘मी बाहेर जावून येतो’ असे सांगून तो घराबाहेर गेला होता. अशोकने प्रमोदच्या मृतदेहाकडे पाहिले. त्याच्या डोक्यास, तोंडावर, नाक वर व हातावर जबर मार लागला होता. त्यातून मोठा रक्तस्त्राव झाला होता. तो बेशुद्धावस्थेत पडलेला होता. डोक्याजवळ रक्ताचे थारोळे साचलेले होते, तसेच पुंडलिक भंडारे याच्या घराजवळ व संपत उघडे याच्या घराच्या मागील दरवाजाजवळ सिमेंट रोडवर मोठ्या प्रमाणात रक्त पडलेले होते व तेथे एक दातदेखील पडलेला होता. या घटनेची खबर मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्रमोदला रूग्णालयात घेवून जाण्यासाठी अँम्ब्युलन्स मागवण्यात आली. अँम्ब्युलन्समध्ये टाकून प्रमोदला सिव्हील हॉस्पिटल, नाशिक येथे नेण्यात आले. डॉक्टरांनी त्याला तपासून तो मयत झाल्याचे घोषीत केले. सिव्हील हॉस्पिटलमध्ये प्रमोदच्या मृतदेहाचा पंचनामा करून पोस्टमार्टम करण्यात आले. त्यानंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अशोक दत्तू निकाळजे याने या प्रकरणी ओझर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली की दि. १२ जानेवारी २०२३ रोजी रात्री २ ते सकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान भाऊ प्रमोद दत्तू निकाळजे (३२) रा. आंबेडकरनगर, ओझर, ता. निफाड यास आंबेडकरनगरातील संपत उघडे यांच्या घराजवळ कोणीतरी अज्ञात इसमाने काहीतरी कारणावरून कोणत्या तरी हत्याराने त्याच्या डोक्यात, तोंडावर, नाकावर व दोन्ही हातांवर मारून गंभीर दुखापत करून ठार मारून त्याचा खून केला आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून ओझर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४/२०२३ भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये अज्ञात मारेकऱ्याविरोधात प्रमोदचा खून केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक अशोक रहाटे यांनी गुन्ह्याचा तपास आपल्याकडे घेतला. जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व ओझर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक रहाटे यांनी घटनास्थळी भेट देवून पहाणी केली. त्यानंतर मयत प्रमोद निकाळजेबाबत सविस्तर माहिती घेतली. मयत हा घटनेच्या दिवशी कोणा–कोणास भेटला, तसेच त्यास शेवटचे कोणासोबत पाहिले याबाबत पोलिसांनी तपास सुरू केला. प्रमोद रहात असलेल्या परिसरातील प्रत्यक्ष साक्षीदारांना पोलिसांनी विचारपूस केली असता पोलिसांना माहिती मिळाली की घटनेच्या दिवशी त्याचे दोन इसमांबरोबर वाद झाले होते, त्याप्रमाणे त्यांची नावे पोलिसांनी मिळवली. त्यानंतर तपास पथकाने ओझर गावातून जयेश देवराम भंडारे व संदीप मधुकर बनसोडे या दोघांना ताब्यात घेतले. या दोघांना पोलिसांनी विश्वासात घेवून विचारपूस केली असता दोघांनी प्रमोदचा आपणच खून केल्याची कबुली दिली.१२ जानेवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास प्रमोद यास तलवार व चॉपरने डोक्यावर, तोंडावर आणि हातावर वार करून गंभीर जखमी करून जीवे ठार मारल्याचे त्यांनी सांगितले. मारेकऱ्यांचा शोध लागल्याने व त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याने पोलिसांनी जयेश देवराम भंडारे व रावसाहेब उर्फ संदीप मधुकर बनसोडे दोघे रहाणार आंबेडकरनगर, ओझर यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला.

## कलियुगात हे असे कसे झाले...

पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी तात्काळ पोलिस ठाण्यात येवून सदरील इसमाची प्राथमिक माहीती घेत त्याला विश्वासात घेवून विचारपूस केली. तेंव्हा सुग्रीव अप्पाराव कावळे यांने सुरूवात केली. मी रा. ब्रम्हवाडी ता.चाकूर जि.लातूर येथील ठिकाणचा राहणार आहे. मला आई कुषाबाई, पत्नी दिव्या, दोन मुले –अजय व विजय यांचेसह राहतो. माझा मोठा भाऊ– धनंजय हा सन २०१८ मध्ये अटॅक येवून मरण पावला आहे. त्यांची पत्नी– सत्यकला ही मुलांबाळासह उदगीर येथे भाडयाने राहते. माझा दुसरा भाऊ मोहन हा तीन वर्षापासून त्याची पत्नी व मुलांबाळासह चामेवाडी येथे राहतो. भाऊ मोहन हा खंडू वकील यांचे शेतात नोकरी करतो. सन २०१८ पासुन निकया ग्रुप कन्ट्रक्शन कंपनी कल्याणनगर पुणे येथे ड्रायव्हर म्हणून मी कामाला होतो. कंपनीमध्ये काम करत असताना सन २०२१ मध्ये राम कुमदाळे हा लातूर येथील चाकुर तालुक्याचा राहणारा असल्याने त्याचेसोबत माझी ओळख व चांगली मैत्री जमली होती. त्यामुळे आम्हा दोघांमध्ये हमेशा फोनवर व प्रत्यक्ष बोलणे चालु होते. रामची पत्नी दोन वर्षापासून त्यास सोडुन गेली होती व वडील वारले असल्याचे मला माहीत होते. त्यामुळे पुणे येथे कामाला न जाता दोघे मिळून काही पैसे भरुन पार्टनरशिपमध्ये एकादे वाहन खरेदी करून लातूरलाच काम धंदा करुत असे ठरले होते. यावर्षी दिवाळीच्या वेळेस राम कुमदाळे आणि मी आम्ही दोघेही गावाकडे आलो होतोत. तेव्हा मी तीन लाख रुपये व रामने एक लाख रुपये असे चार लाख रुपये रोख भरुन बाकी लोन करुन लातूर येथून नवा आयशर टेम्पो खरेदी करण्याचे ठरले होते. त्यानुसार आम्ही दोघानी मिळुन आयशर शोरुममध्ये चार लाख रुपये रोख भरुन राम व मी दोघे मिळुन माझ्या गावाकडे गेलो होतो. लातूर येथील जाताना आम्ही मटन घेवुन गेलो होतो. रात्री १०.३० वाजताचे सुमारास मी, माझी पत्नी व राम असे मटणाचे जेवन करुन बोलत बसलो नंतर १२.०० वाजताचे सुमारास झोपी गेलो. मी व राम बाहेर पलंगावर झोपलो होतो व पत्नी लेकरासोबत मध्यल्या रुममध्ये कडी लावुन झोपली होती. रात्री ३.०० वाजताचे सुमारास रुमच्या कडीचा आवाज आल्याने मी झोपेतुन ऊठुन पाहीले असता, राम व माझी पत्नी दोघेही हातात हात धरुन रुममधुन बाहेर आल्याचे मला दिसले. तेव्हा मी रामला रुममध्ये का गेला होतास असे विचारले असता, पाणी पिण्यासाठी गेल्याचे कारण सांगीतले व पत्नीने पण राम पाणी पिण्यासाठी आल्याचे सांगुन पत्नी लघवी करुन मधल्या रुममध्ये झोपी गेली व राम माझ्या सोबत बाहेर झोपला. राम सकाळी उठून चहा पिवुन त्याचे गावी निघुन गेला होता. माझी पत्नीने सकाळी डोक्यावरून अंघोळ केली होती. दुसऱ्या दिवशी राम हा पुण्याला गेला होता, त्या दिवशी माझ्या पत्नीने माझ्या सोबत वाद घालुन, पुण्याला जाणार आहे, तुझे लेकरे तुझ्या जवळ ठेव असे म्हणुन बॅगमध्ये कपडे भरुन निघाली होती. तेव्हा गावातील काही लोकांनी तिला समजावुन सांगीतल्यामुळे ती गावातच थांबली होती. सदर घटनेची माहीती मी माझ्या सासऱ्याला सांगीतली असता, दुसऱ्या दिवशी माझे सासरे माझ्या गावी येवुन पत्नी मुलांबाळांना माहेरी हिप्परगा ता. लोहा जि.नांदेड येथे घेवुन गेले होते. राम पुण्याला असतानाच मला आयशर शोरुम मधुन आमची गाडी आल्याबाबतचा फोन आल्याने माझी आई, बहीण वनिता, भावजी देवीदास, भाच्चा– राजेश व मी असे शोरुम मधुन गाडी घेवुन चामेवाडी येथे बहीणीच्या घरी थांबलो. मी गाडी आल्याबाबतची माहीती रामला फोनवर दिली होती. चार दिवसानंतर राम हा पुण्याहून लातूरला आला होता त्या दिवशी गॅरेजला गाडी लावुन चिल्लर कामकाज करुन रामच्या गावी आटोळा येथे गाडीची पुजा केली होती. रात्रभर मी रामच्या घरीच थांबलो होतो. दुसऱ्या दिवशी उदगीर येथील मराठवाडा ट्रॅान्सपोर्ट येथे गाडीमध्ये माल भरत असताना भाच्चा राजेश यास आपणाला भाडे घेवुन वाशी मुंबई येथे जायच आहे, रस्सी घेण्यासाठी पैसे घेवुन ये असे सांगीतल्याने भाच्चा राजेश हा उदगीर येथे आला होता. उदगीर येथून वाहनात माल भरुन मी, राम व भाच्चा राजेश असे वाशी मुंबई येथे गेलो होतो. मी व राम दोघेही आयशर चालवित होतो. वाशी येथे माल खाली करून भिवंडीहून नांदेडचा माल भरुन नांदेडला आलो. सदर प्रवासादरम्यान राम हा सारखा फोनवर बोलत होता, मी माझ्या पत्नीला फोन लावले असता तिचा फोन व्यस्त दाखवित होता. दिनांक १६ नोंहेबर २०२२ रोजी एमआयडीसी नांदेड येथे गाडीमधील माल खाली केला. व तेथुनच दिनांक १७ नोंहंबर २०२२ रोजी लातूरचा माल भरुन लातूरला येत असताना लोहा येथे आल्यानंतर मी पत्नीला फोन करुन आपणाला लातूरला जायचे आहे तु लेकरांना घेवुन लोहा येथे ये मी लोहयाला गाडी घेवुन आलो आहे, असे सांगीतल्याने, एका तासाने माझा मेहुणा योगेश हा पत्नी व मुलांना मोटार सायकलवर घेवुन गाडी जवळ आणुन सोडला. तेव्हा चहा पाणी करुन मी, राम, राजेश, माझी पत्नी व लेकरे असे गाडीमध्ये बसुन लातूरकडे येत होतो. लोहा येथून लातूरकडे येत असताना मी गाडी चालवत होतो. गाडीमध्ये राम हा माझ्या पत्नीकडे बघुन वारंवार हाताने चाळे करीत होता व माझी पत्नी देखील त्यांचेकडे बघुन हासत होती. दोघांचे चाळे बघुन मला राग आल्याने मी पत्नी व मुलांना घेवून अहमदपुर येथेच गाडीचे खाली उतरलो. भाच्चा व राम यांना लातूरला माल खाली करायला सांगीतले. तेव्हा राम व भाच्चा राजेश लातूरला गाडी घेवुन निघुन गेले. अहमदपुरहुन लातूरला जात असताना राम हा गाडी चालवित होता. मी अहमदपुरच्या बसस्टॅन्ड मध्ये पत्नीला रामकडे बघुन गाडीत का हसत होतीस, आपल्या घरी सुध्दा राम आणि तु एका रुममधुन हातात हात घालुन बाहेर आला होतात, असे का करतीस म्हणुन समजावुन सांगीतले. बसमध्ये गावाकडे येत असताना, तु जर राम सोबत असे वागलीस तर मी रामला मारून टाकतो असे म्हणालो असता, पत्नीने तुम्हाला काय करायचे आहे, ते करा. मला तुमचे काय देणे घेणे नाही, असे म्हणत होती. मी त्या दिवशी रात्रभर माझे गावीच मुक्कामी थांबलो. दिनांक १८ नोंहेबर २०२२ रोजी दुपारी १.०० वाजताचे सुमारास मी शिवनेरी गेट जवळ लातूर येथे गाडी खाली झाल्याचे ठिकाणी आलो तेव्हा गाडी स्क्रॅप मार्केट येथे माल खाली करण्यासाठी थांबलेली होती. स्क्रॅप मार्केट येथून गाडीच्या ब्रेकचे काम असल्याने राम, भाच्चा राजेश व मी असे आम्ही तिघे जन मिळुन आयशर शोरुम, बाभळगाव नाका, रिंग रोड, लातूर येथे आलो होतोत, राम गाडीजवळ शोरुममध्येच थांबला होता. भाच्चा राजेश व मी दोघे मिळुन अँटोने गाडीचे ऑल इंडीया परमीट काढण्यासाठी आरटीओ कार्यालय लातूर येथे पठाण एजंट कडे गेलो होतो त्याठिकाणी पठाण एजंटला २० हजार ५०० रुपये परमीट काढण्यासाठी दिले व परत ऑटोने आम्ही दोघे बाभळगाव नाका येथे येवुन राईस खाल्ला. मी बाभळगाव नाका येथून रामला फोन लावला असता त्याचा फोन व्यस्त दाखवत होता व नंतर माझे पत्नीला फोन लावला असता तीचा पण फोन व्यस्त दाखवत होता. तेव्हा सायंकाळी अंदाजे ५.०० वाजताचे सुमारास मी रागाचे भरात रिंगरोडला गोजमगुंडे मळयाचे जवळ राम गाडी लावुन बसला होता त्याचेकडे गेलो होतो, त्यावेळी भाच्चा राजेश याला आयशर शोरुमजवळ थाबण्यास सांगीतले होते. गाडी जवळ गेलो असता, राम हा ड्रायव्हर सिटवर बसुन फोनवर बोलत होता. तेव्हा गाडीच्या कॅबीनमध्ये जावुन रामला माझ्या पत्नीला फोनवर का बोलतोस म्हणुन रामसोबत वादावादी केली, तेव्हा राम मला म्हणाला गाडीच्या भाडयातून तुझ्या कर्जाचा हप्ता कसा घेतलास,माझे पैसे परत दे, पैसे नसतील तर तुझी आई व बायको लोकांखाली झोपवून पैसे आणुन दे. अशी मला शिवीगाळ करुन माझ्या अंगावर आला. तेव्हा माझ्यात व राममध्ये मारामारी सुरु झाली. राम व माझ्या पत्नीचे अनैतीक संबंध असल्याचा व मला दिलेल्या शिव्याचा राग आल्याने गाडीमध्येच असलेल्या चाकुने रामच्या पोटात व डाव्या डोळयाजवळ वार करुन गाडीतच रामला जिवे मारुन चादरीत गुंडाळले होते. चाकुचा वार करताना रामने माझ्या उजव्या हाताचे मधल्या बोटाला चावा देखील घेतला होता त्यामुळे मला जखम देखील झालेली आहे. थोडया वेळाने गाडीजवळ माझा भाच्चा राजेश आला, त्याने गाडीत रामला मारलेले पाहुन घाबरुन काय झाले म्हणुन विचारले असता, त्याला रामला का मारले याबाबत सर्व माहीती सांगीतली. त्यानंतर गाडीमध्ये भाच्याला बसवुन रामच्या प्रेतासह बाभळगाव मार्गे चामेगावला जाताना बाभळगावच्या पुढे अंदाजे दोन तीन किलोमिटर अंतरावर एका विहीरीजवळ रोडच्या बाजुला गाडी थांबवली. तेव्हा भाच्चा बाजुला संडासला गेला व तेवढयात मी रोडच्या बाजुला असलेले दोन दगड उचलुन रामला ज्या चादरीमध्ये गुंडाळले होते त्या चादरीमध्ये ते दगड ठेवले व नंतर त्याचे प्रेत चादरीमध्ये बांधुन टाकले. त्याठिकाणी अंदाजे एक तास थांबुन चामेवाडी येथे भाच्चा राजेश याला रोडला सोडले. त्यानंतर मी गाडीने एकटाच पुढे मांजरा नदीवरील पुलावर गेलो. त्याठिकाणी पुलाच्या मधोमध डाव्या बाजुला गाडी थांबवुन गाडीच्या कॅबीनमधुन राम कुमदाळे याचे चादरीमध्ये दोन दगडासह बांधलेले प्रेत खाली ओढुन पुलावरुन नदीच्या पाण्यात ढकलुन दिले होते. त्यांनतर पुलावरुन थोडया अंतरावर बोरी रोडने समोर जावुन गाडी वळवुन परत चामेवाडी येथे बहीणीच्या घराजवळ गाडी लावून अंदाजे रात्री ९.३० वाजताचे सुमारास बहीण वनिता देवीदास काचगुंडे हीच्या घरी गेलो होतो. घरी गेल्यानंतर मनातील भितीने रामला मारल्याबाबतची सर्व माहीती मी बहीण व भावजीला सांगीतली. त्यानंतर बहीणीच्या तेथील बकीट घेवुन पाण्याने गाडीच्या कॅबीनमध्ये पडलेले रक्त पुसून काढले व माझ्या अंगावरील कपडे बदलुन रक्ताचे डाग असलेले कपडे, रामला मारण्यासाठी वापरलेला चाकु एका पिशवीमध्ये व माझ्या पायातील बुट बहीणीच्या घरी ठेवला. त्यानंतर दुस–या दिवशी दि.१९ नोंहेबर २०२२ रोजी पहाटे ५.०० वाजता बहीण व तिच्या घरचे झोपेत असताना उदगीरकडे गाडी भरण्यासाठी जात असताना नांदेड रोडवरील ममदापुर पाटीजवळ होतो तेव्हा बहीण वनिता हिने मला फोन करुन तु कोठे जावु नकोस आहे तेथेच थांब असे सांगुन भाच्चा राजेश याला मोटार सायकलवर माझ्याकडे ममदापुर पाटीवजळ पाठविले. तेव्हा ममदापुर पाटीच्या जवळ असलेल्या भारत पेट्रोलपंपवर गाडी लॉक करुन लावली व भाच्या बरोबर परत बहीणीच्या घरी आलो तेव्हा बहीणीने पोलीस स्टेशनला जावून तुझ्या हातुन झालेली चुक सांग अशी म्हणाल्याने, मी पोलीस स्टेशनला येवुन रामला चाकुने जिवे मारले बाबत सविस्तर माहीती दिली. आरोपीने जबाब कथन केल्यावरून विवेकानंद चौक पोलिस ठाणे लातूर येथे नं. ६४४/२०२२ कलम ३०२, २०१ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करुन गुन्हयाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब खंदारे व सपोनि खंदारे यांचे रायटर पोलीस हवालदार वाजीद चिकले यांनी केला. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपीचे सांगण्यानुसार आयशर टेम्पोच्या जीपीएस डेटाच्या मदतीने मार्ग काढला व त्याआधारे आरोपीने खुन केलेला राम कुमदाळे याचे प्रेतासोबत बांधलेल्या दोन दगडाचे ठिकाण शोधले, आरोपीने प्रेत ज्याठिकाणाहून बोरी येथील मांजरा नदीत फेकले त्याठिकाणचा शोध घेतला, गुन्हयात वापरलेला चाकु, टेम्पो व गुन्हा करताना आरोपीच्या पायात असलेला बुट इत्यादी रक्ताने माखलेल्या अवस्थेत तपासादरम्यान जप्त केल्या. परंतु आरोपीच्या सांगण्यानुसार राम कुमदाळे याचे प्रेत पोलीसांनी फायर ब्रिगेड, गोताखोर, मच्छीमार, स्थानीक लोक, चांगले पोहणारे व बोटच्या सहाय्याने जवळपास एक महीना मयताचा प्रेताचा बोरी येथील मांजरा नदीच्या पात्रात शोध घेतला. परंतु सर्वोत्परी प्रयत्न करुन देखील मयताचे प्रेत मिळुन येत नव्हते. त्यादरम्यान आरोपीचा कबुली जबाब मा न्यायालयात नोंद केला असता प्रेत मिळत नसल्याचे पाहून आरोपी देखील मा न्यायालयात बदलला व मी राम कुमदाळे याचा खुन न केल्याचे सांगु लागला. व त्याने कबुली जबाब देण्यासाठी देखील नकार दिला आणी वकीला मार्फत जामीनासाठी प्रयत्न करु लागला दरम्यान दि.१२ जानेवारी २०२३ रोजी म्हणजेच घटना घडुन जवळपास दोन महीन्याचे कालावधी नंतर आरोपीच्या जामीनावर मा न्यायालयात सुनावणी चालु असतानाच राम कुमदाळे याचे प्रेत बोरी येथील मांजरा नदीवरील बंधा–याच्या पाण्याचे कडेला अर्धवट सडलेल्या स्थितीत चिखलामध्ये मिळुन आले. प्रेताच्या अंगावरील कपडे व खिश्यामध्ये सापडलेल्या पॉकेटमधील ओळखपत्राचे आधारे प्रेत हे राम कुमदाळे याचे असल्याचे लागलीच ओळख पटली व सदरची माहीती लागलीच मा न्यायालयात कळविली. आणि जामीनाच्या प्रयत्नात असलेला खुनी आरोपी सुग्रीव अप्पाराव कांबळे याचा जामीन मा न्यायालयाने रद्द केला. एकंदरीत पत्नी सोबत अनैतीक संबंध असावेत या संशयातुन व टेम्पोच्या भाडयामुळे अकस्मात पणे झालेल्या भांडणात आरोपीने खुन करुन पुरावा नष्ठ करण्यासाठी प्रेत बंधा–याचे पाण्यात फेकुन दिल्याबाबतचे सर्व प्रकारचे पुरावे पोलीसांनी उत्तम रित्या हस्तगत केले असुन आरोपी हा न्यायनिर्णयातुन येणा–या शिक्षेच्या प्रतीकक्षेत जेलची हवा खात आहे. सदर तपासादरम्यान सोमय मुंडे, पोलीस अधिक्षक लातूर, अजय देवरे, अप्पर पोलीस अधिक्षक लातूर, जितेंद्र जगदाळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, सुनिल गोसावी, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर ग्रामीण, सुधाकर बावकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. विवेकानंद चौक लातूर, यांनी वेळोवेळी केलेल्या अमुल्य मार्गदर्शनामुळे सपोनि भाऊसाहेब खंदारे, सपोनि उदय सावंत, पोउपनि हाजी सय्यद, पोउपनि ज्ञानोबा देवकत्ते, पोह. वाजीद चिकले, पोह. मुन्ना पठाण, पोशि. दिपक बोंदर सर्वानी परीश्रम करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपीविरुध्द भक्कम पुरावे जमा करण्यासाठी महत्वाचे योगदान दिले आहे.

## मुलाच्या मृत्यूमुळे ‘तो’ सुडाने पेटला...

समोर आले. मोहन पवार यांच्या चुलत भावानेच हे खून केल्याचे समोर आले आहे. मोहन पवार यांच्या मुलासोबत चुलत भावाचा मुलगा गेला होता. त्यावेळी त्यांचा अपघात झाला होता. त्यांच्या मुलाला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. पण ही बाब मोहन पवार यांनी त्याला सांगितल नाही. ४ दिवसांनी मुलाच्या अपघाताची बातमी मारेकरी चुलत भावाला मिळाली. त्यानंतर मुलाचा मृत्यू झाला. आपल्या मुलाचा मृत्यू झाल्याचा राग मनात धरून मोहन पवार यांच्यासह कुटुंबीयांची हत्या केली आणि मृतदेह भीमा नदीच्या पात्रात फेकून दिली. मोहन उत्तम पवार (वय ४८), संगिता मोहन पवार (वय ४५), राणी शाम फुलवरे (वय २५), शाम फुलवरे (वय २८) आणि रितेश फुलवरे (७) कृष्णा फुलवरे (४) छोटू फुलवरे (३) अशी मृतांची नाव आहे. तर, अशोक कल्याण पवार (वय ४०), श्याम कल्याण पवार (वय ३०), प्रकाश कल्याण पवार (वय ३२) आणि आणखी एक त्यांचा भाऊ अशा चौघांना ताब्यात घेतले आहे. मृतक मोहन पवार यांचे आरोपी हे सख्खे चुलत भाऊ आहेत. दरम्यान सासरे मोहन उत्तम पवार आणि संगीता मोहन पवार हे दोघे पति पत्नी असून राणी शाम फुलवरे आणि शाम फुलवरे हे पवार यांची मुलगी आणि जावई असून त्यांना तीन मुले असा एकत्र परिवार अहमदनगर जिल्ह्यातील निघोज गावात राहत होते. अचानक भीमा नदी पात्रात त्यांच्या लहान मुलांसहित मृतदेह मिळून आले. त्यामुळे त्यांच्या नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त केला. यामध्ये मोहन पवार यांच्या दुसऱ्या मुलाचे एका विवाहित महिले सोबत प्रेम संबंध होते. त्यारागापोटीच घातपात केल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे.

30 JANTO 05 FEB 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 1/28/2023 9:13 PM Page 1



# पैशांसाठी अपहरण केले भीतीपोटी सोडून दिले!

**नाशिक/क्राईम रिपोर्टर**

तुषार सुरेश कलंत्री हे काळेवाडी बाबीवेस सिन्नर, ता. सिन्नर येथे पत्नी व दोन मुले यांच्यासमवेत एकत्रित कुटुंबात रहातात. कलंत्री यांचा कांदा खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे आणि ते चांगले व्यापारी म्हणून ओळखले जातात. कळंत्री यांच्या मोठ्या मुलाचे नाव चिराग असून तो १२ वर्षाचा आहे. गुरूवार दि. ५ जानेवारी रोजी सायंकाळी सात ते साडेसात वाजण्याच्या सुमारास चिराग हा आपल्या मित्रांसोबत काळेवाडीसमोरील मोकळ्या जागेवर खेळत होता. त्यावेळी विनानंबरची सफेद रंगाची ओमनी मारूती कार त्याच्याजवळ आली आणि या कारमध्ये असलेल्या दोघांनी चिरागला ओढत गाडीत टाकून पळून गेले. काही क्षणाच्या कालावधीत ही घटना घडली.





चिरागला गाडीत टाकून पळवून नेल्याने त्याच्यासोबत खेळणाऱ्या मुलांनी एकच आरडाओरडा सुरु केला. चिरागला पळवून नेल्याची वार्ता सर्वत्र पसरली. परिसरातील लोक आरडाओरडा ऐकून घराबाहेर आले. काहींनी चिरागला पळवून नेणाऱ्या ओमनी कारचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र ओमनी मारूती कार सुसाट वेगाने सिन्नर नगरपरिषदेसमोरुन पसार झाली. चिरागच्या आईने चिरागला काही लोकांनी ओमनी कारमधून पळवून नेल्याचे चिरागच्या वडीलांना फोनवरून सांगितले. ही घटना समजताच ते ताबडतोब घरी आले. सर्व घटनेची त्यांनी माहिती घेतली. परिसरात या घटनेने खळबळ उडाली होती. ओमनी कारमध्ये आलेल्या दोघा जणांनी काळ्या रंगाची पँट व डोक्यावर गुलाबी रंगाची टोपी व तोंडाला काळ्या रंगाचे मास्क घातलेले होते. चिरागचे आई-वडील व परिसरातील लोकांनी सिन्नर पोलीस ठाण्यात धाव घेतली. दरम्यान एका मोबाईल फोनवरुन चिरागच्या आईच्या मोबाईल फोनवर फोन आला. त्या फोनवरून चिराग आपल्या आईशी बोलला. 'हे लोक मला कुठेतरी घेवून आले आहेत. ते तुझ्याशी बोलणार आहेत.' असे त्याने सांगितले. त्यानंतर एक अपहरणकर्त्याने चिरागच्या हातातून मोबाईल काढून घेतला आणि त्याच्या आईला दमबाजी केली. मुलाबाबत तुम्ही पोलिसांना सांगितले तर आम्ही तुमच्या मुलाला मारून टाकू अशी धमकी दिली. या धमकीमुळे व मुलाची काळजी वाटू लागल्याने कळंत्री दाम्पत्याने सिन्नर पोलीस ठाणे गाठले. ओमनी कारमधून आलेल्या दोघा इसमांनी बळजबरीने चिराग यास मारूती कारमध्ये टाकून पळवून नेल्याची फिर्याद तुषार सुरेश कळंत्री यांनी सिन्नर पोलीस ठाण्यात दाखल केली. सिन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ९/२०२३ भा.दं. वि. कलम ३६३ नुसार अज्ञात दोघा इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मुलाच्या व आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी मोहिम उघडली. दरम्यान सोशल मीडीयावर सर्वत्र चिरागचा फोटो आणि अपहरण झाल्याची माहिती-मॅसेज व्हायरल झाल्याने अपहरणकर्ते कमालीचे घाबरले. आता आपण पकडले जावू अशी त्यांना भीत वाटू लागली. त्यामुळे चिरागला परत त्याच्या घरी नेवून सोडून देण्याचा निर्णय अपहरणकर्त्यांनी घेतला. दोघा अपहरणकर्त्यांन चिरागच्या डोळ्यांना पट्टी बांधून मोटरसायकलने त्याला बारागावपिंपी शिवारात नेले. तेथे जावून त्यांनी चिरागला पाणी देवून जॅकेट घालण्यास सांगितले. मोटरसायकलवर दोघांमध्ये त्याला बसवत मध्यरात्री १ वाजण्याच्या दरम्यान त्याला सिन्नर पोस्ट ऑफिसजवळ आणून सोडले. त्याला सोडताच त्याने आपल्या घरी धूम ठोकली आणि मग त्याने घडलेली सर्व हकीकत आई-वडीलांना व पोलिसांना सांगितली. पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे व उपविभागीय पोलीस अधिकारी सोमनाथ तांबे यांच्या सुचनेप्रमाणे जिल्हाभरात ठिकठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली. अनेक पथके तपासासाठी रवाना केली. पोलीस चिरागचा शोध घेत असतांनाच रात्री एक ते दीड वाजण्याच्या सुमारास अपहरणकर्त्यांनी चिरागला मोटरसायकलने घरी सोडल्याने सर्वांनी निःश्वास सोडला. दरम्यान एका अपहारणकर्त्याने चिरागच्या आईला फोनवरून कॉल केला होता. त्याचे सीडीआर व तो नंबर कोणाच्या नावावर आहे अशी माहिती काढत पोलीस संशयित आरोपीपर्यंत पोहोचले आणि या गुन्ह्यात सहभागी असलेल्या तिघा आरोपींना गजाआड केले. रोशन बंडू चव्हाण, यश संदीप मोरे व आकाश भास्कर दराडे अशी त्यांची नावे आहेत. या अपहरणकर्त्याकडून गुन्ह्यात-वापरलेली विना नंबरची ओमनी कार व टाटा मांझा ही दोन चार चाकी वाहने, मोटरसायकल व मोबाईल फोन जप्त केले. अपहरण करण्यासाठी अपहरणकर्त्यांनी ३४ हजार रूपयांमध्ये ओमनी कार सिन्नर येथून खरेदी केली होती. सुरूवातीला अपहरणकत्यांनी कळंत्री या व्यापाऱ्याच्या लहान मुलास पळवण्याचा बेत केला होता, मात्र तो आरडाओरड करेल या भीतीने चर्चेअंती त्यांनी तो बेत रद्द केला आणि मोठा मुलगा चिरागचे अपहरण करण्याचे ठरवले. चिरागचे वडील सिन्नर शहरातील मोठे व्यापारी असून त्यांच्याकडे भरपूर पैसा आहे. त्यांच्या मुलाचे अपहरण केल्यास आपल्याला पाच-दहा लाख रूपये आरामात मिळतील असा विचार करून आकाश दराडे याच्यामार्फत चिरागवर लक्ष ठेवण्यात आले. तो खेळण्यासाठी केंव्हा बाहेर पडतो याची माहिती घेवून त्याचे अपहरण करण्यासाठी सायंकाळच वेळ निश्चित केली, त्याप्रमाणे तिघांनी सायंकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास नंबर प्लेट नसलेल्या ओमनी कारने चिरागचे अपहरण केले. परंतु ही घटना सोशल मीडीयावर फोटोसह व्हायरल झाल्याने घाबरून जावून त्यांनी पुन्हा त्याला त्याच्या घराजवळ आणून सोडले. पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोमनाथ तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी. उपनिरीक्षक सुदर्शन आवारी, जमादार रामदास धुमाळ, हरिश्चंद्र गोसावी, मिलिंद इंगळे, हवालदार रघुनाथ पगारे, पोलीस नाईक शहाजी शिंदे, समाधान बोराडे आदींनी या गुन्ह्याच्या तपासात सहभाग घेतला. गुन्ह्यात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी तपास पथकास १५ हजार रूपये बक्षिस देवून त्यांचे अभिनंदन केले.

## उदगीर येथील न्यायालयात ७४वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा!



**देवणी/प्रतिनिधी**

उदगीर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात गुरुवार दि.२६ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी.पी. सतावळेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी न्यायाधीश पी.डी. सुभेदार, न्यायाधीश आर.बी.गिरी, न्यायाधीश जे.सी. गुप्ता, न्यायाधीश के.ए. पोवार, न्यायाधीश एन.जे.चव्हाण यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. व तसेच ध्वजारोहण कार्यक्रमासाठी ॲड. एस.टी पाटील, ॲड. एस.बी, पाटील, ॲड.ए.के. भोसले, ॲड. नारायण पाटील, ॲड. जी.एस. बीरादार, ॲड.बाळासाहेब नवटक्के, ॲड. विष्णू लांडगे, ॲड. सचिन हुडगे, ॲड. ज्ञानोबा सोमवाड, ॲड. अखिल हाशमी, ॲड. बालाजी पाटील, ॲड. रमाकांत पाटील, ॲड. राजेश पाटील, ॲड. बी.एम गुंडरे, ॲड.नाजीम पटेल, ॲड.दयानंद पाटील, ॲड. भगवान पाटील, ॲड.श्रीकांत बडीहवेली, ॲड.हबीब शेख, ॲड. प्रसाद पाटील, ॲड.बालाजी शिंदे, ॲड.एस.जे.कदम, ॲड.बालाजी जगळपूरे, ॲड.बस्वराज बिरादार, ॲड.जयश्री पाटील, ॲड.शहनाज पठाण, ॲड.चंदशेखर भोसले, ॲड.अन्वरखाँ पठाण, ॲड.शरद पाटील, ॲड.श्रवणकुमार माने, ॲड.गंगाधर पांढरे, ॲड.महेश मळगे, ॲड. सचिन पाटील, ॲड.भाऊसाहेब जांबळे, ॲड. पवण कोणे, ॲड. गुलाम यजदानी, ॲड.बीपीन अपसिंगेकर ॲड.प्रशांत कुलकर्णी, ॲड. आनंद मुंढे, ॲड.रमेश पवार यांच्यासह आदी वकील बांधव व न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ समाज ग्रुप तर्फे आरोग्य सहकार्य

**वाडा/प्रतिनिधी**

राजमाता समाज ग्रुपची संकल्पना ज्यांनी मांडली त्या अश्विनी मोरे कोणे ग्रामपंचायत माजी सरपंच व ग्रुप सदस्य यांच्या वाढदिवसा निमित्त एक वर्ष आजाराने त्रस्त आसणारे सुनिल गुरुनाथ मोरे यांना राजमाता ग्रुप तर्फे आरोग्य सहकार्य करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी सुनिल मोरे यांचे कुटुंब उपस्थित होते. तसेच हे आरोग्य सहकार्य संजय हरड, प्रमोद दळवी, दिनेश सरडे, सागर हरड, यांच्या हस्ते देण्यात आले. या आरोग्य सहकार्यासाठी दिलीप पालव, बाळू मुकणे, किरण मरले, शंकर हरळ, नरेश पराड, अंकुश भोईर, संदीप ठाकरे, मनोज गवाले, किसन मोरे, किशोर हरळ, तानाजी कदम, गणेश पराड, गणेश मोरे, रुपेश मोरे, राकेश हरळ, सचिन हरड, या सर्वांचे सहकार्य लाभले, आठ महिन्याच्या कालावधीत आता पर्यंत या समाज ग्रुपने शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात एकूण १५ कार्यक्रम पार पाडले आहेत व जिथे गरज तिथे सहकार्य करू असे विचार विनोद म्हस्कर यांनी व्यक्त केले.

## सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभागात मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम साजरा

**लातूर/प्रतिनिधी**

'माझ्या मराठीचे काय बोलु कौतुके परी अमृता ते ही पैजा जिंके' एवढा अमाप गोडवा असणाऱ्या माय मराठीचे आपण सगळे शिलेदार. सध्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा सुरु आहे. यानिमित्ताने राज्यात विविध कार्यक्रम सुरु आहेत. पण लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा आणि मृदा व जलसंधारण या तीन विभागांच्यावतीने २६ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रम हे मराठी भाषेची गोडी लावणारे, संवर्धन करणारे, लिहिते करणारे होते. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत आयोजित या कार्यक्रमांमध्ये अधीक्षक अभियंता ते लीपिकांपर्यंत सर्वांनी सहभाग नोंदविला. शीघ्र कविता, प्रसिद्ध साहित्यिकाच्या कथा कादंबरी, नाटक याच्या उताऱ्याचे अभिवाचन, मराठी शुद्धलेखन, वादविवाद स्पर्धा, मोबाईलचे मनोगत असे एकाहून एक सुंदर कार्यक्रम यावेळी आयोजित करण्यात आले होते. सगळे कार्यक्रम अत्यंत दर्जेदार, भाषेतले सौंदर्य स्थळे याच्यासह अभिनयाचा समावेश असणारे होते. असे निखळ कार्यक्रम भाषेची अभिरुची वाढविणारे ठरतात. या कार्यक्रमांच्या आयोजनाचे श्रेय जातं ते मराठी भाषेतील उत्तम लेखक आणि लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, दुसरे जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता, साहित्य आणि संस्कृतीचे अभ्यासक अभिजित म्हेत्रे यांना. या दोन अधिकाऱ्यांमुळे सध्या लातूर विभागातील सर्व अभियंते वाचनाकडे वळतायत हे अत्यंत उत्साहवर्धक चित्र आहे. मराठी भाषा पंधरवडा अंतर्गत सर्व स्पर्धा बांधकाम भवन येथील सार्वजनिक बांधकाम मंडळ सभागृहात आयोजित कार्यक्रमांमध्ये हस्ताक्षर स्पर्धा, शुद्धलेखन स्पर्धा, निबंध स्पर्धा, काव्यलेखन, युनिकोड लिपी टंकलेखन स्पर्धा, अभिवाचन स्पर्धा, 'माझ्या आयुष्यातील संस्मरणीय घटना' याबाबत तीन ते पाच मिनिटे बोलणे, 'शालेय शिक्षण मराठीतून की इंग्रजीतून' या विषयावर वादविवाद स्पर्धा, अंताक्षरी स्पर्धा आदी स्पर्धांचा समावेश होता.



## जैन इरिगेशनचा मॉडर्न प्लास्टिक्स इंडिया ॲवॉर्ड ने मुंबईत गौरव ठिबक सिंचन प्रणालींचे उत्पादक म्हणून गोल्ड कॅटेगरीचा सन्मान!

**जळगाव/प्रतिनिधी**

जैन इरिगेशनच्या कार्याला अधोरेखीत करून मॉडर्न प्लॅस्टिक्स इंडियातर्फे मॉडर्न प्लॅस्टिक्स इंडिया ॲवॉर्ड २०२३ भारतातील अत्याधुनिक ठिबक सिंचन प्रणालींचे उत्पादक या प्रकारात गोल्ड कॅटेगरीसाठीचा पुरस्कार नुकताच प्रदान केला गेला. हा सोहळा मुंबईच्या जेडब्ल्यू मॅरियटला पार पडला. कंपनीच्यावतीने मुंबई कार्यालयाचे सहकारी सिनियर व्हाईस प्रेसिडेंट (बँकिंग अँड फायनान्स) आर.बी.देशमुख यांनी स्वीकारला. या सोहळ्यास जगभरातील निवडक प्लास्टिक उदयोगातील उद्योजक, सरकारी अधिकारी, विविध कंपन्यांचे अधिकारी व प्रतिनिधी, संशोधक आणि निर्यातदार व आयातदार मान्यवर उपस्थित होते. कृषी क्षेत्रातील अग्रगण्य व लौकीक प्राप्त जैन इरिगेशन ही कंपनी आपली विविध उत्पादने शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत आहे. अत्याधुनिक सिंचन प्रणाली, उच्च तंत्रज्ञान, ॲग्रोनॉमिस्ट सपोर्ट करीत असते. परिणामी शेतकऱ्यांचे पिकांचे उत्पादन आणि उत्पन्न दोघांमध्ये दुप्पटीहून अधिक वाढ झालेली आहे. विश्वातील कृषी क्षेत्रामध्ये प्रिसीजन फार्मिंग व प्लास्टिकल्चरचा चपखल उपयोग शेतकरी करीत आहेत. भारतातील प्लास्टिक उद्योगातील सकारात्मक बदल घडविणाऱ्या कंपनी संस्थापक, कंपन्यांचे नेते आणि उदयोजकांना प्रामुख्याने देण्यात येतो. मॉडर्न प्लास्टिक इंडिया हे एक अग्रणी मासिक आहे. त्यामध्ये जगभरातील प्लास्टिक विश्वातील घडामोडी प्रकाशीत होतात. जिनु जोसेफ हे मॉडर्न प्लास्टिक ग्लोबल नेटवर्कचे सीईओ आणि मुख्य संपादक असून त्यांच्या संकल्पनेतून हे पुरस्कार दिले जातात.



## आनंद दिघे यांच्या जयंती निमित्त वाड्यात वैद्यकीय तपासणी व उपचार शिबीर



**वाडा/प्रतिनिधी**

धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंती निमित्त वाडा तालुक्यातील परळी नाका येथे शुक्रवारी (दि.२७ जानेवारी) मुतखडा आजारावरील तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वाडा नगर पंचायतीचे माजी उपाध्यक्ष संदीप गणोरे यांच्या संकल्पनेतून शिबिराचे आयोजन केले होते. तर डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व एस.एम.बी.टी.हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिबिराचे उदघाटन आमदार शांतराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. मुत्रवीकारावरील उपचार सर्वसामान्य नागरिकांना न परवडणारे असल्याने गणोरे यांनी या आजारावरील मोफत उपचार व शास्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करून सामान्य नागरिकांना दिलासा दिला असल्याचे मत यावेळी आमदार शांताराम मोरे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शांताराम मोरे यांच्यासह पालघर जिल्हा संघटक वसंत चव्हान, जिल्हा संघटक महिला आघाडी वैष्णवी रहाने, डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशनचे जिल्हा संघटक निकी नाईक, वाडा पंचायत समिती उपसभापती सागर ठाकरे, एस.एम. बी.टी. हॉस्पिटलचे डॉ.सविनय पाटील, पल्लवी परदेशी, रोहिणी रोंगटे, गणेश बिन्नर, नरेंद्र चौधरी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. दुपारपर्यंत पन्नासुन अधिक रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला.


## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'एच' नवघर-माणिकपूर, ता. वसई, जि. पालघर**

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ला अधिन राहून या नोटीसीद्वारे वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकतधारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत/तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | बऱ्हामपूर | VN14/38841/3 | स्नेहा सुबोध फडके | मारीया डेल्फीना लुईस |
| २. | बऱ्हामपूर | VN14/38841/7 | आसरे ॲन्थोनी अंद्रादे | रोनाल्ड परेरा/ विरा रोनाल्ड परेरा |
| ३. | बऱ्हामपूर | VN14/38841/14 | सुरेश बोहरा | सोफिया दालमेद |
| ४. | बऱ्हामपूर | VN14/38841/12 | केविन मायकल डायस व इतर १ | मेरी कार्डोज |
| ५. | चुळणा | VN02/54385 | मे. अगरवाल ॲण्ड दोशी असोसिएट्स | कालीप्रसाद एस. प्रजापती व इतर १ |
| ६. | दिवाणमान ७ | VN30/17155 | थानाराम पी. सिरवी | विजय विठोबा चव्हाण व इतर १ |
| ७. | नवघर १/२ | VN04/61597 | मे.जय बिल्डर्स ॲण्ड डेव्हलोपर्स | मुकेश मोतीलाल जैन व इतर १ |
| ८. | दिवाणमान ८ | VN31/20830 | गोविंद महादेव केकाडे | गीतांजली गोविंद केकाडे व इतर १ |
| ९. | माणिकपूर १/१ | VN15/44527 | भास्कर उमाकांत वनमाळी | तुषार भास्कर वनमाळीॉ |
| १०. | माणिकपूर १/२ | VN16/62239/28 | मे. आयडीयल प्रॉपर्टीज | लीयाज डिमेलो/ मिलरेड्र डिमेलो |
| ११. | नवघर १/२ | VN04/24986 | कैफुल्लाह एच. शेख | खिमजी भानजी शाह/ कमलाबेन शाह |
| १२. | नवघर १/२ | VN04/24957 | सुपर्णा शुशांत दास/ निलाद्री दास | निखिल खिमजीभाई शाह |
| १३. | नवघर ४/१ | VN09/3831 | दिपक सकाभाई चेखलिया | दिपक सकाभाई चेखलिया व इतर २ |
| १४. | बऱ्हामपूर | VN14/57025 | भास्कर पद्मा अमीन | निधी निशीगंध पारकर व इतर १ |
| १५. | दिवाणमान ६/१ | VN28/10633 | निलेश छगनलाल लाड व इतर १ | गौरव प्रमोद साळगावकर व इतर १ |
| १६. | दिवाणमान ४ | VN25/59927 | लक्ष्मीचंद आर. पांचाळ व इतर १ | जलपा भार्गव सोनेजी |
| १७. | दिवाणमान ४ | VN25/8891 | मॅथ्यु जॉर्ज | बंसराज पंचम प्रजापती व इतर १ |
| १८. | दिवाणमान १ | VN22/1263 | माधवी विश्वनाथ पुराणकर व इतर १ | दत्तु एस. धनगर/ पल्लवी दत्तु धनगर |
| १९. | उमेळमान | VN01/57807/3 | द्वारका नारायण किणी | विशाल विठोबा बागवे व इतर १ |
| २०. | दिवाणमान ४ | VN25/6123 | मुकेश आर. नारीयलवाला व इतर १ | अनिता टुंटुन गुप्ता व टुंटुन गुप्ता |

जावक क्र.: ववशिम/६६३८/२०२२-२३
दिनांक : २७/०१/२०२३

सही/-
**(गिलसन घोन्सालवीस)**
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'एच'
वसई-विरार शहर महानगरपालिका

30 JANTO 05 FEB 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/28/2023 9:13 PM Page 1



# ना जात ना पात पठाणला जनतेची साथ!

जाती धर्माचा अतिरेक देशाचे किती आणि कसे नुकसान करतो याचे जिवंत उदाहरण पाकिस्तानच्या रूपाने जगासमोर आहे. धर्माच्या नावावर पाकिस्तानची निर्मिती झाली, पण गेल्या ७५ वर्षात पाकिस्तानची काय अवस्था झाली हे आपण पाहतोय. आज पाकिस्तानात भाकरीच्या एका तुकड्यासाठी लोक एकमेकांच्या उरावर बसत आहेत. पाकिस्तान पूर्णपणे बरबाद झाला आहे. जगातील अनेक देशांच्या समोर कटोरा घेऊन भिक मागतोय, पण भीक सुद्धा मिळेनाशी झाली आहे आणि याला कारण आहे जाती धर्माचं राजकारण! पाकिस्तानातील या घटनांपासून पाकचा जवळचा शेजारी असलेल्या भारताने आणि खास करून इथल्या कट्टरपंथी हिंदूंनी काहीच धडा घेतलेला नाही. त्यामुळे हिंदू कट्टर पंथीयांचा हैदोस जर यापुढे असाच सुरू राहिला. तर भारताची अवस्था सुद्धा पाकिस्तान सारखीच होईल आणि हे सर्व यासाठीच सांगायचे आहे की सध्या पठाण सिनेमावरून कट्टरपंथी हिंदुत्ववाद्यांनी पठाणचा विरोधात जे हिंसक आंदोलन सुरू केले आहे. ते चुकीचे आहे. कारण पठाण एक कलाकृती आहे आणि त्याकडे मनोरंजनाच्या नजरेतूनच बघायला हवे. कारण कला किंवा कलाकाराला धर्म नसतो. पण शाहरुख खान केवळ मुस्लिम आहे म्हणून काही मूठभर धर्मांधांनी पठाण विरुद्ध आंदोलन छेडले आहे. पण या देशात हिंदू किंवा मुस्लिम कट्टर पंथीय लोकांपेक्षा राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुत्वाची भावना जपणाऱ्यांची संख्या अधिक आहे आणि याच धर्मनिरपेक्षता जपणाऱ्या लोकांमुळे या देशाची एकता आणि अखंडता टिकून आहे. आणि म्हणूनच पठाणला विरोध करणाऱ्यांच्या नाकावर टीचून पठाण वाजत गाजत प्रदर्शित झाला आणि पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिस वर त्याने १०० कोटींचा गल्ला जमवला. पठाणला विरोध करणाऱ्या जातीयवादी हुल्लडबाजी करणाऱ्यांसाठी ही एक मोठी चपराक आहे. जे विरोध करीत आहेत ते पठाण किंवा शाहरुख खानचा बाल ही बाका करू शकले नाहीत. कारण या मूठभर जातीयवादी लोकांपेक्षा धर्म आणि जातीयवादाला विरोध करणाऱ्या लोकांची संख्या या देशात अधिक आहे आणि हेच भारतमातेचे खरे सुपुत्र आहेत. आणि जातीयवादी हिंदू असोत की मुसलमान त्यांना धडा शिकवण्याची ताकत याच निधर्मी वादी लोकांच्या मनगटात आहे. राहता राहिला सवाल बॉलिवूडचा! तर बॉलीवूड हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा होता. पण मागील काही काळापासून चित्रपटांच्या कॉपी राईट्या बेकायदेशीर धंदा सुरू झाला आणि चित्रपट सिनेमा गृहात प्रदर्शित होण्यापूर्वीच तो मोबाईलवर लोकांना दिसू लागला. त्यामुळे प्रेक्षकांनी चित्रपट गृहांकडे पाठ फिरवली. परिणामी चित्रपट गृह ओस पडू लागल्याने ती बंद पडू लागली. वास्तविक सरकारने याकडे गांभीर्याने पाहायला हवं होते. पण काँग्रेस असो की भाजप कोणत्याही सरकारने याकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळं भारताला कोट्यवधींचा महसूल मिळवून देणारा हा व्यवसाय डबघाईला आला आणि आतातर बंद होण्याच्या मार्गावर होता, जर हा व्यवसाय बंद झाला, तर या व्यवसायावर पोट भरणारे अभिनेते-अभिनेत्री निर्माता दिग्दर्शक पासून स्पॉट बॉय पर्यंतचे लाखो लोक बेरोजगार होतील. त्यांच्यावर उपासमारीची पाळी येईल. त्यामुळेच चांगले चित्रपट बनायला हवेत. त्यासाठी सिनेमागृह असायला हवीत, तरच हा व्यवसाय टिकून राहील. आज बऱ्याच वर्षांनी पठाण सारखा चित्रपट प्रदर्शित झालाय आणि त्याला तुफान यश मिळाले आहे. सिनेमा गृह पुन्हा गजबजली आहेत. तिथे प्रेक्षकांची आता गर्दी दिसायला लागली आहे. बॉलिवूडसाठी हे चित्र आशादायी आहे. पठाण सारख्या चित्रपटांमुळे चित्रपट सृष्टीला संजीवनी मिळू शकते, म्हणूनच प्रत्येक भारतीयाने पठाणला साथ द्यायला हवी आणि पठाणला विरोध करणाऱ्यांच्या विरोधात उभे राहायला हवे. तसे झाल्यास हा देश जातीयवादी लोकांच्या विरोधातील लढ्याचे पाहिले पाऊल ठरेल आणि २०२४ सालात त्याचे परिणाम बघायला मिळतील. आजकाल लोक जात धर्म याला फारसे महत्व देत नाहीत. देव आणि धर्म लोकांच्या ह्रुदयात असतो, त्याला रस्त्यावर आणून त्याचा बाजार मांडायचा नसतो. कारण माणसाच्या दैनंदिनी जीवनाशी देव आणि धर्माचा फारसा संबंध नसतो. त्यामुळे आस्तिक असतो त्यालाही दोन वेळच अन्न मिळत आणि नासतीक असतो त्याच्याही पोटात दोन घास जातात. फक्त माणसाने मिळेल ते काम करायचे असते. खुद्द भगवान श्रीकृष्णाने सुद्धा गीतेत हेच सांगितलेले आहे की कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन! असे असतानाही काही अंधभक्त व्यवहारी जीवनातही देव आणि धर्म आणून लोकांची दिशभुल करतात. आणि आपला धर्म किती श्रेष्ठ आहे हे दाखवण्यासाठी दुसऱ्याच्या धर्मावर टीका करीत असतात. मात्र प्रत्येक धर्मात जी माणूसकीची बंधुभाव आणि परोपकराची शिकवण दिलेली आहे, त्याकडे कट्टरपंथीय पाठ फिरवतात. आज भारतात हेच सुरू आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्टीत धर्म आणला जातो. पठाण जर मोहन भागवतांच्या नातेवाईकांनी काढला असता तर कट्टरपंथीय हिंदुत्ववाद्यांनी त्याला विरोध केला असता का? शाहरुख खान केवळ मुसलमान आहे आणि कधीकाळी त्याने पाकिस्तानी कलाकारांच्या विषयी आपुलकी दाखवली होती त्याचा आता राग काढला जातोय. पण पठाण ही एक मनोरंजक कलाकृती आहे. त्यातून देशाचे किंवा धर्माचे नुकसान होणार नाही आणि मुख्य म्हणजे सेन्सॉर बोर्डाने पास करून त्याला प्रदर्शनाची परवानगी दिली आहे. त्यामुळे त्याला विरोध करण्याचा प्रश्नच येत नाही. लोकांना हे कळतंय म्हणून तर लोकांनी पठाणला साथ दिली आणि विरोध करणाऱ्यांना एकाकी पाडले तेंव्हा यातून जातीयवादी लोकांनी धडा घ्यावा.

# स्वातंत्र्य ते आर्थिक स्वातंत्र्य, अन् कर्जमुक्ती ते सुराज्य, यासाठी स्वतंत्र शेतकरी मंत्रालय व्हावे!

२६ जाने. १९५० हा प्रजासत्ताकदिन भारताच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहिलेला काळ आहे . परंतु राष्ट्रपिता स्व. महात्मा गांधीनी दि. २७ जाने. १९४८ व २९ जाने. १९४८च्या दोन पत्रांन्वये ला जनतेला दिलेल्या संदेशात म्हटले की, भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ ला जरी स्वातंत्र्य मिळाले असेल, तरी देशाला पुन्हा सुराज्य व आर्थिक स्वातंत्र्याची चळवळ पुन्हा उभारावी लागेल.(साभार- दै. लोकसत्ता दि. २७ डिसें. २०२२), आणि नंतर दुसऱ्याच दिवशी दि. ३० जाने. १९४८ ला ग्रामस्वराज्य संकल्पनेचा म्हणजेच महात्मा गांधीचा खून झाला. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व भारतीय समाजाला समावेशक असलेला संविधान ग्रंथ तयार करून तो घटना समितीच्या वतीने जनतेला सुपूर्द केला . भारतीय संविधान घटना पद्धती नुसार या देशाचा कारभार चालावा अशी घटना समितीची, व भारतीय जनतेची इच्छा होती . परंतु अतिशय कमी अल्पावधीत म्हणजे १८ जून १९५१ ला पंडित जवाहरलाल नेहरूनी हंगामी सभापती असताना, पहिली घटना दुरुस्ती केली. औद्योगिक क्रांतीच्या पछाडलेल्या विचारसरणीने भारतीय शेतकरी शेतमजुरांचा घात केला. शेतकरी शेतमजुरांच्या विरोधात कायदे तयार झाले. गोरे इंग्रज गेले व काळे इंग्रज तयार झाले. अल्पावधीतच उषःकाल होता.. होता...., काळरात्र झाली अन् उभ्या आयुष्याच्या आता पुन्हा पेटवा मशाली !

ज्या काळात औद्योगिक वस्तू चे उत्पादन होत नव्हते, त्या काळात औद्योगिक क्रांतीची गरज होतीच हे जरी सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट असले तरी, या देशाची औद्योगिक प्रगती मात्र शेतकऱ्यांना व शेतमजुरांना मारूनच व शोषणातूनच झाली, हे सुद्धा नाकारता येत नाही. म्हणजेच पंडित जवाहरलाल नेहरू यांना संविधानाप्रमाणे देश चालवायचा नव्हता, हे सुद्धा तेवढेच सत्य आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख सत्तेच्या बाहेर पडले. लोकनियुक्त सरकार निवडून सन १९५५ मध्ये स्थापन झाले. लोकनियुक्त सरकार नसताना पहिली घटना दुरुस्ती झाली, हा भारत देशावर असलेला कलंक व आघात आहे. या निर्णयाच्या विरोधात शेतकऱ्याला सुप्रीम कोर्टात सुद्धा जाता येत नाही कारण ही व्यवस्था केंद्रीय आयात-निर्यात धोरणाच्या व अर्थ मंत्रालयाच्या अखत्यारीतील बाब आहे. निवडणूक आयोगाच्या घटनेनुसार जनतेने निवडून पाठविलेले प्रतिनिधी हे पक्ष प्रतिनिधी असतात. म्हणून ते पक्षप्रमुख व पक्षाचे किंग मेकर यांच्या सूचनांचे पालन करतात. कारण आमदार ,खासदारांनी, मंत्र्यांनी, हातपाय जोडून, अतिशय गुलामगिरीने तिकीट मागून लाचारी स्वीकारलेली आहे. व्यवस्थेला निवडणूक आयोगाची व्यवस्था सुद्धा दोषपूर्ण आहे. निवडणुकीत जाहीर झालेले जाहीरनामेतील जर आश्वासने पूर्ण झाली नाही तर त्याला सुप्रीम कोर्टात सुद्धा आव्हान देता येत नाही.या दोषपूर्ण व्यवस्थेमुळे जनता निष्क्रिय झाली. जनतेच्या हातून सुटलेला शिक्याचा गोटा, मारलेला शिक्का पुन्हा शेतकऱ्यांना व मजुरांना गुलामगिरी कडे वळविला गेला.

त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे डॉलरच्या तुलनेत अवमूल्यन सुरू झाले अन् त्यानुसारच आज पर्यंत राज्यकारभार चालत आला. पण त्याच त्या पद्धतीने काँग्रेस राजवटीने कारभार चालवला गेला, तसेच नंतर सुद्धा अनेक राजकीय पक्षांची सत्तांतरे झाली पुढे तेच बीजेपी सरकारने सुद्धा आतापर्यंत तशीच आर्थिक धोरणे राबविली. काँग्रेसचाच वारसा चालवीला, अन् राज्यकर्त्याच्या खोट्या बाजाराने जनता त्रस्त झाली. सत्याची जागा खोट्याने घेतली. खोट्या व्यवस्थेचा उदो उदो करून भ्रष्टाचारी व्यवस्था सुरू झाली. या खोट्या व्यवस्थेच्या कारभारामुळे कर्मचारी वर्ग सत्ताधीशांच्या दबावामुळे त्रस्त झाला, व त्यांना सुद्धा नाईलाजाने खोटी कामे करावी लागली, व काही कर्मचाऱ्यांनी व सत्ताधीशांनी अतोनात पोटे भरले. भ्रष्टाचाराचे जणू काही त्यांच्या हाती चराऊ कुरणच लागले. शेतकऱ्यांच्या शेतमजुरांच्या घामाचा पैसा शासकीय व्यवस्थेने खाल्ला. शासनाचा पैसा प्रत्यक्ष कामासाठी न जाता बराचसा निधी गहाळ होत गेला. शासनाची तिजोरी खाबुगिरी म्हणून तयार झाली. म्हणजेच संत तुकाराम महाराज, महात्मा फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे बाबांच्या स्वप्नातील, भारत देश हा ग्राम स्वराज्य व सुराज्य कडे वळविला गेला नाही. शेतकरी, शेतमजुरांचे शोषण करूनच देशाची आर्थिक प्रगती झाली. याला संपूर्ण जबाबदार आजची राजकीय सत्ता आहे.महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्या च्या संकल्पनेतील भारत उभा करण्याची चळवळ वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी, कर्मयोगी गीताचार्य तुकाराम दादांनी अहो रात्र राबविली. त्यांनी अड्याळ टेकडी (ता. ब्रह्मपुरी जिल्हा चंद्रपूर) या ठिकाणी ग्रामस्वराज्याची संकल्पना साकार केली आणि त्यास विचारधारेवर स्वर्गीय शरद जोशी यांनी शिक्का मोर्तब केले. आंबेठाण (जिल्हा पुणे) येथील अंगार मळ्यातून कृषी अर्थ प्रबोधिनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते घडविले व आर्थिक स्वातंत्र्याची मशाल पेटवली. 'शेतकऱ्यांचे मरण म्हणजे सरकारचे धोरण' हे त्यांनी जाहीर केले. पुन्हा आर्थिक स्वातंत्र्यासाठी सुराज्य निर्माण करण्यासाठी संपूर्ण देशात व्यापक चळवळ उभी केली. आणि देशाला संदेश दिला...

इडा पिडा टळणार आहे बळीचे राज्य येणार आहे. अन् सत्तेपुढे पुढे शहाणपण चालत नाही हेच दिसून आले. आजच्या राजकीय सत्ताधीशांनी व राज्यकर्त्यांनी पुन्हा त्यांच्या विचाराचा पालापाचोळा करण्याचा प्रयत्न केला. परंतु शरद जोशींचा , डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महात्मा गांधींचा, व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ग्राम



स्वराज्याचा विचार आजही झाकला गेला नाही, तर तो पुन्हा उभारणीस येणार आहे. जगद्गुरु तुकाराम महाराजांनी सावकारी वही खाते इंद्रायणीत डुबवून शेतकरी कर्जमुक्त केला होता. अन लाखो वारकऱ्यांनी पंढरीला टाहो फोडून यावर्षी पाऊस येऊ दे व शेतकरी सुखी होऊ दे म्हणता म्हणता आता तो आत्महत्या करू लागला. मात्र राज्यकर्त्यांनी व सत्ताधीशांनी तो सुखी होऊ दिला नाही. तर तो कंगाल राहून गुलामगिरीत जगला पाहिजे व तो सतत शासनाकडे भीक मागत राहिला पाहिजे हे स्वप्न बाळगत राहिले. कर्मयोगी गाडगेबाबांनी ऋणमोचन (ता. दर्यापूर, जिल्हा अमरावती) या गावापासून( ऋणमोचनचा अर्थ :- ऋण म्हणजे कर्ज व मोचन म्हणजे मुक्ती) गोरगरिबाच्या कल्याणासाठी ऋणमोचनचा संदेश संपूर्ण भारत देशात कर्मयोगी बाबांनी पसरवीला. काल परत्वे जनतेच्या कल्याणासाठी या पृथ्वीवर साक्षात्कार घडविण्यासाठी, अनेक संत महात्म्यांनी ऋषींनी व महापुरुषांनी जन्म घेतले. त्यानुसारच जनकल्याणाच्या वाटचाली पिढ्यां पिढ्या चालूच आहेत. शेतकऱ्यांच्या दुःखाच्या वाटा मोकळ्या होण्यासाठी धार्मिक रुढीच्या परंपरेने भागवत कथा, वारकरी दिंडी, भजन, कीर्तने या माध्यमातून ती फक्त शमविल्या गेली. या प्रणालीत बऱ्याच लेखक, पत्रकार, कवी, कीर्तनकार, वारकरी भागवतकार, या सर्वांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे भांडवल करून स्वहित जोपासले, त्यात फक्त जनतेचे मनोरंजन झाले. परंतु शेतकऱ्यांचे दुःख मात्र संपले नाही. तर ते अजूनही उग्र स्वरूप धारण करण्याची तयारी दिसत आहे. भारताची परंपरा ही ऋषी व कृषीची असून त्यानुसार भगवद्गीतेचा आधारातूनाच संत ज्ञानेश्वराची...., ज्ञानेश्वरी तयार झाली. ज्ञानेश्वरीच्या आधारावरच संत तुकारामाची..., तुकाराम गाथा तयार झाली. अन तुकाराम गाथेच्याच विचारधारेतून, शेतकऱ्यांचा राजा छत्रपती महाराजांच्या आदर्श तयार झाला. महात्मा फुलेंची आर्थिक मांडणी समग्र क्रांतीची विचारसरणी तयार झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुद्धा समाजा साठी सर्वसमावेशक २६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधान तयार झाले . परंतु त्या संविधानाप्रमाणे मांडलेली अर्थव्यवस्था बदलविल्या गेल्यामुळे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता तयार झाली. ग्राम गीतेचा विचार धारा खेडोपाडी गावोगावी पसरण्याचा कार्य स्वर्गीय गीताचार्य तुकाराम दादांनी( कुऱ्हा तालुका चांदुर बाजार , जिल्हा अमरावती ) येथून जन्म घेऊन अड्याळ टेकडीचा आदर्श ठेवून संपूर्ण देशात पसरविली. या देशात अर्थवादी विचार पसरविणे मागे पडले व धर्माच्या विचारसरणीने उचल खाल्ली. आणि त्यातून धर्म द्वेष व माणूस द्वेष तयार झाला. शेतकऱ्यांच्या दुःखाचे मूळ हे केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणात आहे हे शरद जोशीं च्या साहित्य चळवळीतून व लाखोंचे मेळावे घेऊन साक्षात्कार घडला.आज ती वाटचाल पुणे जिल्ह्यातील आंबेठाण येथील अंगार मळ्यातून बाहेर पडली व अंगारवाटा म्हणजेच अर्थगाथेतून ती प्रकाशित झाली. त्याच ध्येयाने प्रेरित झालेले शेतकरी नेते श्री धनंजय पाटील काकडे यांच्या शेतकरी-वारकरी, कष्टकरी महासंघाच्या वतीने देहू ते पंढरपूर या जनजागर यात्रा च्या स्वरूपात महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यातून शेतकऱ्यांचे शेतकरी विरोधी कायदे व शेतकरी समस्या सोडविण्यासाठी शेतकरी मंत्रालयाची कां गरज तयार झाली? हे विषय जनप्रबोधन यात्रेतून समाजाला माहीत होतील . या देशात समस्या सोडविण्यासाठी कृषिमंत्रालय, महसूल मंत्रालय झाले, जनतेच्या सोयीसाठी दिव्यांग मंत्रालय, क्रीडा मंत्रालय झाली , मग कोट्यां कोटी शेतकऱ्यांचे प्रश्न का वाऱ्यावर सोडले गेले हा देशातील सर्वात मोठा महत्त्वाचा प्रश्न आजही अनुत्तरीय आहे.शेती वाहताना शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न तयार झाले. त्यासाठी शेतकरी नेते धनंजय पाटील काकडे यांनी तीर्थक्षेत्र देहू येथील तुकाराम गाथा मंदिरा मध्ये दि.११ नोव्हेंबर २०२२ ला आर्थिक स्वातंत्र्यासाठी देशात व राज्यात शेतकरी मंत्रालय स्थापन व्हावे व शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडून शेतकरी सुखी व्हावा यासाठी तुकाराम महाराजांना साकडे घातले. राजकारणात समाजकारण न होता सत्ताकारण तयार झाले. शासनाच्या तिजोरीसाठी आज कोणताही राजकीय पक्ष कोणाशीही युती करायला तयार झाला . सर्व राजकीय पक्षांनी आपले नीती धर्म बदलविले. पुढेही सत्ताधीशांना व राज्यकर्त्यांना शेतकऱ्यांची लूट व शेतमजुरांची लूट सर्रासपणे अव्याहात करावयाची आहे, हेच यातून स्पष्ट होते. त्यासाठी या देश विरोधी कारवाया हाणून पाडण्यासाठी सर्व जनतेने आता आपली कंबर कसली पाहिजे नाही.



**लेखक : धनंजय पाटील काकडे,**
**कार्याध्यक्ष, शेतकरी संघटना समन्वय समिती,**
**महाराष्ट्र (९८९०३६८०५८)**

# मानसिक स्वास्थ्याला हवी प्राथमिकता!



आरोग्य म्हणजे शारिरीक, मानसिक व सामाजिकदृष्टया सदृढ असल्याची अवस्था असून केवळ आजार वा दिव्यांगत्व नसणे म्हणजे आरोग्य नव्हे. मानसिक आरोग्य मात्र समजायला कठीण आहे. जीवनात येणाऱ्या विविध अनुभवांना एका विशिष्ट ध्येयाने वा उद्देशाने प्रेरित होऊन सुयोग्य प्रतिसाद देणे हे मानसिक आरोग्य चांगले असल्याचे लक्षण आहे. थोडक्यात मानसिक आरोग्य म्हणजे माणसाच्या व्यक्तिमत्वाचा व भावनिक कलांचा समतोल विकास होणे. ज्यामुळे व्यक्तीला इतरांसोबत सलोख्याचे जगणे शक्य होईल. मनातील आशा, आकांक्षा, भावना व आदर्शाचा समतोल राखून जीवनात येणाऱ्या सुख दुःखांना समर्थपणे तोंड देणाऱ्या क्षमतेलाही भावनिक आरोग्य म्हणता येईल.

मानसिक आरोग्य बिघडण्यास आपल्या जैविक, सामाजिक, मानसिक, गरज पूर्ण न होणे हे प्रमुख कारण आहे. मानसिक आरोग्याचा अर्थ असा आहे की, व्यक्ती आपल्या आयुष्यातील मुलभूत गरजा पूर्ण करु शकते. त्यासाठी स्वतःच्या सामर्थ्याचा वापर करते. परंतू योग्य वेळी त्यावर नियंत्रण ही ठेवते. व्यक्तीचे विचार, जाणीवा, कार्य करण्याची पध्दत, इच्छा व महत्वाकांक्षा, प्रत्येक गोष्टीस धैर्याने तोंड देणे, इतर व्यक्ती समाधानी व आनंदी राहतील, असा प्रयत्न करणे याचा अंतर्भाव मानसिक आरोग्यात केला जातो. व्यक्ती शारीरिक स्वास्थ्य चांगल्या प्रकारे संतुलित करु शकतो, परंतु सध्याच्या धावपळीच्या युगात मानसिक स्वास्थ्य व्यवस्थितीत ठेवणे कठीण बनले आहे. आरोग्य संपन्नता याला आजच्या आधुनिक युगात अतिशय जास्त महत्त्व दिले जात आहे. आरोग्य संपन्न व्यक्ती म्हटल की, पटकन डोळ्यांसमोर पिळदार स्नायुचा उंचपुरा व्यक्ती उभा राहतो. आपण असे गृहीत धरतो की, आरोग्य हे फक्त शारीरिक असते आणि एखादा व्यक्ती शारीरिकदृष्ट्या आजारी पडला म्हणजे तो आजारी आहे. आपल्या आरोग्याच्या एका अत्यंत महत्त्वाच्या शारीरिक घटकाकडे आपण दुर्लक्ष करतो ते म्हणजे आपले मानसिक आरोग्य. शारीरिक व मानसिक स्वास्थ्य हे एकमेकांसोबत संबंधित आहे. परंतु व्यक्तिमत्वाचा पाया हा मानसिक स्वास्थ्यावरच अवलंबून आहे, हे आपण विसरतो.

**मानसिक स्वास्थ्याबाबत जागृत राहण्याची गरज**

चांगल्या व्यक्तिमत्वासाठी चांगल्या शारीरिक स्वास्थ्यासोबतच मानसिक स्वास्थ्य सुध्दा चांगले असणे आवश्यक आहे. आपण शारीरिक स्वास्थ्याबद्दल जेवढी काळजी घेतो, तेवढी काळजी मानसिक स्वास्थ्याची काळजी घेण्याबद्दल आपण जागृत नाही. अनेकदा आपण मानसिकरित्या असामान्य आहोत, हे मान्यच करीत नाहीत किंवा परिस्थितीनुरूप आपले वर्तन सुध्दा तसे ठेवत नाही. त्यामुळेच आपल्याला सामान्य व असामान्य वर्तन मनस्थिीती यातील फरक ओळखता येत नाही. आपले वर्तन आपण स्वतः कधीच निरीक्षण करीत नाही. पण इतर लोकांना आपल्या वर्तनाची जाणीव होते. छोट्याशा कारणाने रागावणे, विचित्र वागणे, असंबंध बोलणे, वर्तनातील इतरांच्या चुका काढणे, स्वतःच्या चुकांवर पांघरुण घालणे, बोलणे व हसणे बंद करणे, सतत चिंता करणे, दुसऱ्यांवर संशय घेणे, उदासीनता, अतार्किक विचार करणे, भिती वाटणे, इतरांबद्दल अयोग्य विचार करून स्वतःमध्ये असामान्यता निर्माण करणे ही त्यातील काही उदाहरणे आहेत.

सभोवतालच्या वातावरणात झपाट्याने होणाऱ्या बदलांचा थेट परिणाम मानवाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होत आहे.त्यामुळे व्यक्तीच्या मनासिक तणावात वाढ झाल्याचे स्पष्ट झालेले आहे. योग्यप्रकारे ताण हाताळणे हे मनासिक स्वास्थ्याचे लक्षण आहे. परंतु, ताण प्रमाणाबाहेर असल्यास व त्याचे समायोजन योग्य प्रकारे साधता न आल्यास त्याचे अनेक दुष्परिणाम होतात.

**मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी काय कराल?**

एकीकडे शरीर उत्तम दिसावे म्हणून वेगवेगळ्या ब्रॅन्डचे कपडे, दागदागिने, वापरले जातात. जिम, सायकलिंग, ट्रेकिंग, वेगवेगळे खेळ, डाएट ट्राय केले जातात. परंतु, मनाची मशागत करण्यासाठी विशेष कोणतेही प्रयत्न होत नाहीत. मन हलकं फुलक ठेवण्यासाठी नव्या नजरेन आपण जगणं समजून घेण्यासाठी फार कुठला वेगळा खर्च अपेक्षित नसतो. फार वेगळ्या क्लासलाही जायची गरज नसते. अगदी साध्यासाध्या गोष्टीसुध्दा आपण आपल्या मनाच्या आरोग्यासाठी नक्कीच अंगीकारू शकतो. काय काय करता येईल त्यासाठी? मनाचे आरोग्य बिघडल तर डॉक्टरांकडे जावे, उपचार करून घ्यावेत हे तर उत्तमच. पण एरव्हीही मानसिक आरोग्य बिघडू नये, म्हणून काही गोष्टी करता येतील. घरातल्याशी बोला, झोप, जेवण व व्यायाम, ध्येयावर लक्ष केंद्रीत करा, परिस्थितीशी समायोजन करणे, जीवन संघर्षमय आहे हे मान्य करा, दुसऱ्यांना मदत करणे, शारीरिक स्वास्थ्याकडे लक्ष देणे, समस्यांचा सामना करणे यासारख्या गोष्टीतून आपण आपले मानसिक आरोग्य सांभाळू शकतो.

**मानसिक आरोग्यविषयी कोणाकडून मदत घ्यावी?**

प्रशिक्षीत मनोविकृती तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता तसेच जिल्हास्तरावर जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम, जिल्हा शासकीय रुग्णालये प्राथमिक आरोग्य केंद्रातील मनशक्ती मानसिक क्लिनिक इत्यादी ठिकाणी मानसिक आरोग्याविषयी उपचार व मदत मिळतील. १०४, ढशश्रशचछड १४४१६ आणि १८०० ८९१ ४४१६ या दूरध्वनी क्रमांकावर तज्ज्ञांची विनामुल्य सेवा उपलब्ध आहे, अशी माहिति जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमच्या चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ श्रीमती सरिता शेडे यांनी दिली.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# भिवंडीत अपहरण झालेल्या दीड वर्षीय चिमुरड्याची सुखरूप सुटका करण्यात शहर पोलिसांना आले यश!



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरात २६ डिसेंबर रोजी कामतघर परिसरातून अपहरण झालेल्या दीड वर्षीय चिमुरड्याचा शोध लावण्यात शहर पोलिसांना यश आले आहे. दीड महिन्या नंतर चिमुरडा आई वडिलांच्या कुशीत विसवल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला असून, विक्री करण्यासाठी चिमुरड्याची चोरी करणाऱ्या एक व्यक्तीसह दोन महिलांना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहर पोलीस ठाणे हद्दीतील हनुमान नगर कामतघर येथील सुंदरी रामगोपाल गौतम या घरात कपडे धुवत असताना त्यांचा दीड वर्षीय वर्षीय मुलगा घराबाहेर खेळत असताना सिद्धांत याचे अपहरण झाले होते. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असता घटनेचे गांभीर्य पाहता पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील वडके व वरिष्ठ पो निरी चेतन काकडे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि रविंद्र पाटील, पो.हवा.खाडे, राणे, भोसले, पवार, कोदे, नंदिवाले, हरणे, गावीत असे पथक तयार करून गुप्त बातमीदाराच्या मदतीने तपास करताना जंगजंग पछाडले. पोलीस पथकाने नेपाळ सीमेपर्यंत आपला तपास करीत शोध मोहीम घेतली असता एका मोबाईल क्रमांकाचा तांत्रिक तपास करीत संशयित गणेश नरसय्या मेमुल्ला वय ३८ रा. भाग्य नगर, कामतघर यास ताब्यात घेऊन त्याकडे कसून चौकशी केली असता त्याने मूल चोरी करून १ लाख ५ हजार रुपयांना विक्री केल्याचे कबुल केले. त्यानंतर पोलीस पथकाने पद्मानगर नवजीवन कॉलनी या परिसरात राहणाऱ्या भारती सुशील शाहु वय ४१ व आशा संतोष शाहु वय ४२ या दोघींना ताब्यात घेऊन त्यांच्या जवळून चिमुरड्याची सुखरूप सुटका केल्या नंतर पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी चिमुरड्यास आईवडिलांच्या हाती सुखरूप स्वाधीन केले. या तिघां विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करीत अटक करण्यात आले आहे. भारती सुशील शाहु व आशा संतोष शाहु या दोघी बहिणी असून आशा हिस मूल नसल्याने तिने मूल विकत घेण्याचा निर्णय घेतला. तो तिने बहीण भारतीस बोलून दाखवला भारती ची ओळख गणेश नरसय्या मेमुल्ला या सोबत असल्याने त्यांनी हा कट रचून मूल चोरी करून विक्री करण्याचा निर्णय घेतला व त्यानंतर गणेश मेमुल्ला याने हनुमान नगर परिसरात टेहळणी करून लहान मूल हेरले त्यामध्ये सिद्धांत हा त्याच्या नजरेत आला व त्याने त्याचे अपहरण करून विक्री केल्याचे तपासात उघड झाले आहे. २६ डिसेंबर रोजी सिद्धांत हरविल्या पासून त्याचे पानपट्टी चालवीणारे त्याचे वडील रामगोपाल हे व आई सुंदरी वेडेपिसे झाले होते. पोलीस तपास करीत असताना आई वडील सुध्दा शोध घेत वणवण फिरत होते .स्वतः जवळ गाडी नसताना शेजाऱ्यां कडून गाडी घेऊन व्यवसाय बंद करून मुंबई ठाणे कल्याण भिवंडी या परिसरात शोधून त्रस्त झाले होते. आई त्या धक्क्याने आजाती पडल्याने आठ दिवस रुग्णालयात दाखल करावे लागले.२६ जानेवारी रोजी दोघे आईवडील भिवंडी शहरात शांतीनगर गैबी नगर परिसरात शोधून रात्री साडेदहा वाजता घरी परतले. डोळ्यात दुःख भरलेले असताना शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतन काकडे यांनी मोबाईल वर फोन करून पोलीस ठाण्यात बोलावून घेतले व त्यांच्या समोर चिमुरड्यास हजर केल्यानंतर आईवडिलांच्या अश्रूंचा बांध फुटला. ते आनंदाश्रू पोलिसांच्या शोधा मुळे शक्य झाले असे सांगत सुंदरी गौतम यांनी पोलिसांच्या सहकार्या बद्दल आनंद व्यक्त केला. शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकांनी महिनाभर या मुलाच्या शोधासाठी अथक प्रयत्न केले होते पोलिसांच्या प्रयत्नांना यश येत डबल एक महिन्यांनी मुलाची सुखरूप सुटका करून आई-वडिलांच्या स्वाधीन केल्याने भिवंडी पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी शहर पोलीस ठाण्यातील पोलीस पथकाचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देत सन्मान केला.

# स्त्री सन्मानासाठी मुलांच्या सर्व दस्तऐवजावर वडिलांसोबत आईचेही नाव जोडण्याची मागणी



**वाडा/वार्ताहर**

समाजातील महिला वर्ग हा नेहमीच वंचित आणि दुर्लक्षित घटक मानला जातो. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा मुलभूत अधिकार प्रदान केला आहे. परंतू प्रत्येक्षात मात्र महिला आणि विशेषतः माता या समानतेच्या अधिकारापासून स्वातंत्र्याची पंच्याहतरी नंतरही वंचित आहेत. सन २०२२ हे वर्ष आपण भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. म्हणून किमान अमृतमहोत्सवी वर्षात तरी महिलांना आणि भारतातल्या प्रत्येक मातेला तीचा समानतेचा अधिकार मिळायला हवा, यासाठी स्त्रीने जन्म दिलेल्या तिच्या बाळाच्या नावापुढे वडिलांसोबत त्या जन्म देणाऱ्या मातेचे नाव सुद्धा लागले गेले पाहिजे. तसेच या संदर्भात सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांवर, दस्तऐवजांवर जिथे कोणत्याही व्यक्तीचे नाव लिहिण्याची सक्ती असते. तिथे नाव, मधले नाव आणि आडनाव असे तीनच रकाने उपलब्ध असतात. यात एक रकाना वाढवून नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव असे चार रकाने करावेत व ते भरणे सक्तीचे करुन सर्व मातांना त्यांचा समानतेचा अधिकार देण्यात यावा. अशी मागणी श्रामजीवी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे केली असून त्याची एक प्रत पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांना दिली आहे. याप्रसंगी श्रामजीवी संघटनेचे सरचिटणीस विजय जाधव, जिल्हा अध्यक्ष रामभाऊ वारणा, कार्याध्यक्षा स्नेहा पंडित-दुबे, सरचिटणीस बाळाराम भोईर यांच्यासह इतरीही कार्यकर्ते उपस्थित होते.

## भिवंडीतील ट्राफीक समस्या सोडवण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे वाहतूक पोलीस उपायुक्तांना साकडे!



**भिवंडी** : शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे भिवंडी शहर प्रमुख प्रसाद पाटील यांनी शनिवारी ठाणे वाहतूक पोलीस उपायुक्त विनय राठोड यांची भेट घेत भिवंडीतील वाहतूक कोंडीच्या समस्येतून नागरिकांची सुटका करण्याची विनंती केली. भिवंडी तीन आमदार व एक खासदार त्यातही केंद्रीय मंत्री असतानाही भिवंडीतील वाहतूक कोंडीच्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नसल्याने आपण शिवसैनिकांसह वाहतूक पोलीस उपायुक्तांची भेट घेत शहरातील वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाय योजना उपायुक्तांसमोर नकाशा समोर ठेऊन मांडल्या असून येत्या काही दिवसात आपण स्वतः भिवंडी शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी शहरात एका बैठकीचे आयोजन करणार असल्याचे आश्वासन वाहतूक पोलीस उपायुक्त विनय राठोड यांनी आपल्याला दिले असून त्यामाध्यमातून लवकरच भिवंडीतील नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे असे शहर प्रमुख प्रसाद पाटील यांनी दिली आहे.

# देशप्रेम देशहित जपण्यासाठी आपण सर्वजण जुळलेले आहोत -दिग्दविजय पांडे



**उल्हासनगर/प्रतिनिधी**

देशप्रेम, देशभक्ती देशहित जपण्यासाठी आपण सर्व भारतवासी जुळलेले असुन त्यासाठी असे राष्ट्रीय सण साजरे केले जातात असे मत शहाड येथील सेच्युरी रेयान कंपनीचे युनिट हेड दिग्विजय पांडे यांनी ७४व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले. शहाड येथील सेच्युरी रेयॉन कंपनीच्या रामलीला मैदानात सेच्युरी रेयान कंपनीतील वरिष्ट कर्मचारी गोडवीन सालगीया यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन ७४ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून युनिट हेड दिग्विजय पांडे हे बोलत होते. ते आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हणाले की, तिरंगा फडकवुन राष्ट्रगीत गातांना प्रत्येक भारतीय नागरीकाचा देशाभिमान जागा होतो. हीच या देशाची संक्रुती आहे. असे बोलुन सर्वाना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी श्रीकांत गोरे (एच.आर.प्रमुख) बिर्ला काँलेजचे डॉ. नरेशचद्र, डॉ.हरेष दूबे, सुरेश शिंदे (कर्नल) आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सेच्युरी रेयान स्कूल, सुरक्षा विभाग, बिर्ला स्कुल, बिर्ला काँलेज, होम गार्ड,आदीनी शिस्तबद्ध आणि उत्कृष्ट संचालन करुन सर्वाचे लक्ष वेधुन घेतले. यावेळी सेच्युरी रेयॉन हायस्कूल चे शिक्षक, विद्यार्थी, कंपनीचे कामगार,व कर्मचारी यांच्या सह शेकडो नागरीक प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिल व्यास यांनी केले तर आनंद ठाकुर (जनरल मॅनेजर) यांनी आलेल्या सर्वाचे आभार व्यक्त केले. दरवर्षी शहाड येथील सेच्युरी रेयान कंपनीच्या वतीने सामाजिक, धार्मिक, राष्ट्रीय सण साजरा केले जात असुन भारतीय नागरीकांच्या मनात सतत देशभावना जाग्रुत राहावी हाच उद्देश कंपनीचा असल्याचे मनोगत सेच्युरी रेयान कंपनीचे जनसंपर्क अधिकारी मेहूल लालका यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.




**२०२१-२२ मध्ये कराटे खेळात उल्लेखणीय कामगिरी केल्याबाबत मालाडमधील कु. आदित्य पेडणेकर याचा खासदार गोपाळ शेट्टी यांनी सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला. बोरीवलीतील बाळासाहेब ठाकरे क्रीडांगण येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आदित्यचे वडील समीर पेडणेकर यांनी आपल्या मुलाला योग्य वेळी योग्य दिशा दिल्याबाबत त्यांचं कौतुक गोपाळ शेट्टींनी केलं.**

# एक्झाम वारीयर्स विद्यार्थी पालकांसाठी कानमंत्र ठरेल -खा.सुधाकर शृंगारे



**लातुर/प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील नव युवकांना समर्पित केलेले एक्झाम वारियर्स हे पुस्तक देशातील विद्यार्थ्यांना आणि पालकांना नवा कानमंत्र देणारे ठरणार आहे, परीक्षेचा तणाव बाजूला सारून परीक्षेला कोणत्या पद्धतीने सामोरे जायला पाहिजे यासंदर्भातील ३४ मंत्र नरेंद्र मोदी यांनी या पुस्तकात दिले आहेत. हे मंत्र देशातील विद्यार्थी आणि पालकांसाठी कानमंत्र ठरतील असा विश्र्वास खासदार सुधाकर शृंगारे यांनी व्यक्त केला आहे.ते लातुर शहरातल्या ज्ञानेश्र्वर विद्यालयात परीक्षा पे चर्चा उपक्रमाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशातील विद्यार्थ्यांना उद्देशून केलेली परीक्षा पे चर्चा खासदार सुधाकर शृंगारे यांनी विद्यार्थ्यांसोबत बसून ऐकली. खासदार सुधाकर शृंगारे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक्झाम वारियर्स हे पुस्तकही वितरित करण्यात आले. परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी कोणत्या पद्धतीने तयारी करावी, पालकांनी आपल्या मुलांची परीक्षेसाठी कशी तयारी करून घ्यावी. त्याच बरोबर मुलांच्या शारीरिक आणि बौद्धिक सदृढतेसाठी करावयाची योगासने याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. एक्झाम वारीयर्स या पुस्तकात नरेंद्र मोदी यांनी परीक्षे संदर्भातील सूक्ष्म निरिक्षणे नोंदवली आहेत, सहजतेने परीक्षेची तयारी सांगताना यश संपादन करण्याचा सहज मार्गही सांगितला आहे,त्यामुळे एक्झाम वारीयर्स हे पुस्तक विद्यार्थ्यांना कानमंत्र देणारे ठरेल असा विश्वास खासदार सुधाकर शृंगारे यांनी व्यक्त केला आहे. खासदार सुधाकर शृंगारे यांच्या हस्ते दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना एक्झाम वारियर्स हे पुस्तक वितरित करण्यात येत आहे. ज्ञानेश्वर विद्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या याकार्यक्रमात खासदारांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत एक्झाम वारियर्स पुस्तकाचे महत्व पटवून दिले. यावेळी खासदार सुधाकर शृंगारे यांच्यासह, युवा मोर्चाचे पदाधिकारी अजित पाटील कव्हेकर, माजी नगरसेवक अजय दुडिले, रवीं गणेश गोजमगुंडे, संजय सोनकांबळे, अतिष कांबळे, शैलेश भडिकर, प्राचार्य वाघमारे सोपान, उपप्राचार्य पेद्देवाड, पर्यवेक्षक संजय मलवाडे, प्राध्यापक विश्वनाथ खंदाडे व इतर शिक्षक-शिक्षिकासह विद्यार्थी उपस्थित होते.

# निलंगा शहरातील शिवाजी चौकातील देशी दारू दुकान कायमचे बंद करण्याची फडणवीसाकडे निवेनाद्वारे मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

निलंगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात देशी दारू विक्रीचे परवाना धारक दुकान असून गेल्या अनेक वर्षापासून सदरील दारू दुकान हटवावे अशी मागणी होत असताना देखील राजकीय पुढाऱ्यांच्या आशीर्वादाने सदरील दारू दुकान हे चालू असून यावर कोणाचा अंकुश राहिला नाही.तसेच मुख्य चौकात असल्याने तळीराम दारू पिवून रस्त्यावरच आपले बस्तान मांडल्याने याचा त्रास रस्त्यावर येजा करणाऱ्या महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सदरील देशी दारू दुकानजवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, मंदिरे, इंग्लिश स्कुल, भाजी मार्केट, आश्रम शाळा आहेत. महिला लहान मुले मुलीना तळीरामाचा त्रास होत आहे,तसेच तळीराम दारू पिऊन रस्त्यावर पडून आर्वाच भाषेत शिव्या घालत असल्याने विशेषता महिला वर्गांना तळीरामाच्या त्रासाला सामोरे जावे लागत असून शहरातील नागरिक वैतागून गेले आहेत. सदरील देशी दारू दुकान दहा ते बारा वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज चौकात चालविले जात आहे मागील काळात शहरातील सामाजिक संघटनानी तक्रारी अर्ज करून हे दुकान शहराबाहेर उचलावे असे निवेदन प्रशासनास दिले असता संबंधित दुकान मालक यानी एक वर्षे दुकान बंद ठेवले होते. परंतु शहरातील काही राजकीय पुढाऱ्यांनी आपली पोळी भाजून घेण्यासाठी सदरील दुकान चालू करण्यास नाहरकत देताच पुन्हा हे दारू दुकान सुरू झाले आहे. काही सामाजिक संघटनेच्या पुढाऱ्यांना आर्थिक देवाणघेवाण करून पुन्हा हे दारू दुकान सुरू असल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. लहूजी शक्ती सेनेचे मराठवाडा कार्यध्यक्ष गोविंद सुर्यवंशी व पत्रकार उत्तम माने यानी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस याना तक्रारी अर्ज देऊन सदरील देशी दारू दुकान कायमचे बंद करावे अशी मागणी केली आहे. आठ दिवसात संबंधित दारू दुकान चालकाने हे दुकान बंद नाही केले तर आझाद मैदान मुंबई येथे अमरन उपोषण करणार असल्याचे गोविंद सुर्यवंशी व पत्रकार उत्तम माने यानी सांगितले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यानी तात्काळ लक्ष घालून हे दारू दुकान बंद करावे अशी मागणी शहरातील नागरिकातून होत आहे.

# वलांडी व तळेगाव भोगेश्वर शिवारातील सोलारचे वायर व स्टॉटर पळविले; अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी व तळेगाव भोगेश्वर शिवारातील विहिरीवरील तीन शेतकऱ्यांचे एकुण ३० हजार रुपये किमतीचे सोलारचे वायर व स्टॉटर एकाच रात्री पळविल्या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती मंगळवार दि.२४ जानेवारी रोजी देवणी पोलिसांच्या वतीने देण्यात आली.

याबाबत देवणी पोलिसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.१३ जानेवारी रोजी मध्यरात्री तळेगाव भोगेश्वर शिवारातील गणेश काशिनाथ पोतदार यांची जमीन सर्वे नंबर ८९/५ मधील वहिरीवरील ५ हजार रुपये किमतीचे स्टॉटर चोरून घेऊन गेले तर येथील रंगराव रामराव जाधव यांचे गट नंबर ९३/२ मधील विहिरीवरील ५ हजार रुपये किमतीचे स्टॉटर चोरून घेऊन गेले आहे व तसेच याच रात्री वलांडी शिवारातील ज्ञानोबा दत्तात्रेय पाटील यांच्या गट नंबर ५५/१ मधील विहिरीवरील गोल्डी सोलार गोल्डी पंपाचे मोटार वायर स्टॉटर २० हजार रुपयांचे चोरून घेऊन गेले आहे. या प्रकरणी गणेश काशिनाथ पोतदार राहणार तळेगाव यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २०/२०२३ कलम ३८९ भादवी प्रमाणे अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हेडकाँस्टेबल सुग्रीव गंगाराम कोंडमंगले हे करीत आहेत.

# पोलिसांकडून मयत इसमाचा वारसांचा शोध!



वसई : वसई तालुक्यातील माणिकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मृत्यूची नोंद झाली असून मयत इसमाचे नाव सदानंद चौधरी उर्फ राजू वय ५५ वर्ष पूर्ण पत्ता माहित नाही. २९ डिसेंबर रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास स्टेला पेट्रोल पंपाच्या समोर वसई रोड कडे जाणाऱ्या रस्त्याच्या पुटपायरीवर अशक्तपणा अवस्थेत एक इसम पडलेला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या इसमाला माणिकपूर पोलिसांनी उपचारासाठी सर डीएम पेटीट रुग्णालय वसई येथे दाखल केले असता ५ जानेवारी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास रुग्णालयातील डॉक्टरने त्यांना मयत झाल्याची घोषित केले. पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांचा शोध घेतला, पण कुणीही मिळून आले नाही. मयत इसम त्याचे वर्णन निळ्या रंगाची कपडे, दाढी वाढलेली, चेहरा उभट अशा वर्णनाचा इसम याच्या नातेवाईकाचा शोध माणिकपूर पोलीस घेत आहेत. याबद्दल कोणास काही माहिती मिळाल्यास माणिकपूर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा याचा तपास एम.के.वडणे पोलीस उपनिरीक्षक करीत आहेत.

# विद्यार्थिनींनी अन्याय अत्याचार सहन न करता निर्भीडपणे पोलिसांकडे तक्रार करावी-पोलीस निरीक्षक दशरथ पाटील




**वाडा/प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थिनींनी शाळेत येता जाताना मुलांकडून होणाऱ्या अत्याचाराला बळी न पडता निर्भीडपणे आपल्या शिक्षक किंवा पोलिसांकडे लेखी तक्रार करावी असे आवाहन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी केले ते जनसंवाद अभियान अंतर्गत कार्यक्रमात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, लग्न ही एक आयुष्यातील महत्वाची प्रक्रिया आहे. ते होणारच आहे पण त्या अगोदर शिक्षण पूर्ण करून स्वत:चे भवितव्य घडावा, प्रेम प्रकरणाच्या भानगडीत पडू नका, अल्पवयीन मुलीशी लग्न केल तर गुन्हा दाखल होतो. वाडा तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना कायदे विषयक माहिती देण्यासाठी मंगळवारी (दि. २४ जानेवारी) मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक हिम्मतराव सरगर, पो.कॉ. अविनाश सोनवणे, मुख्याध्यापक डी. जी.दाते, शिक्षक व्ही.बी.बंजारा, वृषाली पाटील, भाई पाटील, डी.जी.गिरासे, मयूर वाडील, पी.व्ही सिसट, बागुल, शिक्षिका वृषाली पाटील, पोलीस पाटील सुभाष पाटील आदी उपस्थित होते.

## प्रजासत्ताकदिन साजरा

लातूर : राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाताविद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा ७४वा प्रजासत्ताकदिन साजरा करण्यात आला. संस्थेचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते ध्वजारोहन करून संकुलातील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य गणपत मुंडे, प्रा. आर. व्ही. जायेभाये, प्रा. मदन धुमाळ, राजीव मुंढे, सुधाकर लोहकरे, आदी उपस्थित होते.

# नॅशनल पॅरामेडिकल कॉलेज येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**वाडा/प्रतिनिधी**




वाडा तालुक्यातील बबन मोरे चॅरिटेबल ट्रस्ट वाडा संचालित नॅशनल पॅरामेडिकल कॉलेज अंतर्गत यशोतेज कौशल्य विकास केंद्र वाडा येथे गुरुवार दि. २६ जानेवारी रोजी आपल्या भारत देशाचा ७४ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला राजेश सुनिल डेगांणे (सेवा निवृत्त जवान) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर पोलीस कर्ममचारी गजानन जाधव, बाबासाहेब घुगे, तडवी, तसेच सामाजिक कार्यकर्ते सुलतान भाई शेख, लाखन भाऊ भरवाड, संस्थचे अध्यक्ष रविंद्र मोरे, त्यांचे सहकारी रविंद्र पाटिल, संस्थेच्या सचिव सुनिता मोरे, हेमंत पाटील (क्रिडा शिक्षक)सर्व कॉलेज प्राध्यापक वर्ग व आदी मान्यवर उपस्थित होते, सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका आमरिन शेख व डि. एम. एल. टि.द्वितीय वर्षामधील विद्यार्थीनी वैष्णवी पाटील हिने केले. सदर कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. डि. एम. एल. टि. प्रथम वर्षामधील विद्यार्थीनी संजना बरफ हिने परेड संचलन द्वारे आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सेवा निवृत्त जवान राजेश सुनिल डेगांणे ध्वजारोहण करण्याची विनंती केली. सेवा निवृत्त जवान राजेश सुनिल डेगांणे यांनी परेड विनंतीनुसार ध्वजारोहण केले. परेड संचलन सुचनेनंतर सर्वानीं ध्वजाला सलाम केला. ढोल, बिगुल यांच्या तालावर भारत गौरव गीत, जन गन मन व ध्वज गीताचे गायन झाले.

पान १ वरून...

## अखेर सव्वा वर्षांनी खुनाचा गुंता...

आले होते. परंतु तिचा कुठेच थांगपत्ता लागला नाही. त्यानंतर या प्रकरणाचा तपास मुंबई गुन्हे शाखा कक्ष ९ कडे सोपविण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास सुरू झाला.पोलिसांनी सदिच्छा हिच्या मोबाईलचे लोकेशन तपासले असता,तेव्हा तिचे शेवटचे लोकेशन वांद्रे बँड स्टॅन्ड येत होते. त्यामुळे पोलिसांनी तोच धागा पकडून तपास सुरू केला.दरम्यान सदिच्छा साने प्रकरणात हिवाळी अधिवेशनातही प्रश्न उपस्थित केला गेला. वांद्रे बँड स्टॅण्ड येथे तिने जीवरक्षक मिथू सिंगसोबत सेल्फी काढली होती. या माहिती वरून या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला.गुन्हे शाखा युनिट ९ ने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करतानाच १०० पेक्षा अधिक जणांची चौकशी केली. सदिच्छाला शेवटचे जीवरक्षक मिथू सिंगने पाहिले होते.तसेच घटनास्थळावर मिथ्थू लाइफ रिंग घेऊन जाताना दिसत होता. तसेच त्याने घरी येऊन इन्स्टाग्रामवर सदिच्छाला फ्रेंड रिक्वेस्टही पाठवली होती.त्यामुळे गुन्हे शाखेच्या पथकांचा त्याच्यावर संशय बळावला. तपासत मिथ्थू आणि अब्दुल यांच्यामध्ये मोबाइलवरून संाभाषण झाले होते. त्यामध्ये दोघेही सदिच्छाबाबत आक्षेपार्ह आणि अश्लील बोलत असल्याचे तपासातून स्पष्ट झाले. सदिच्छा बँड स्टँड येथे भेटल्यानंतर काही वेळाने मिथ्थू पाण्यात बुडू नये यासाठी वापरली जाणारी लाइफ रिंग घेऊन जाताना सीसीटीव्हीमध्ये दिसत आहे. इतकंच नाही, तर तिला भेटल्यानंतर तो घरी आला आणि मोबाइलवरून तिला इंस्टाग्रामवर रिक्वेस्ट पाठवली. याबाबत सुरुवातीला तो समाधानकारक उत्तरे देत नव्हता. चौकशीला सहकार्य करीत नसल्याने पोलिसांनी न्यायालयात त्याच्या नार्को चाचणीसाठी अर्ज केला आणि त्याची चाचणीही करण्यात आली. अखेर वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी जीवरक्षक मिथ्थू सिंग आणि त्याचा मित्र अब्दुल जब्बार अन्सारी या दोघांना अटक केली. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्यांची पोलीस कोठडी मिळवून अधिक चौकशी केल्यावर मिठ्ठू सिंगनं पोलिसांना वेगळीच माहिती दिली . 'त्या दिवशी माझी ड्युटी वांद्रे बँडस्टँडवर होती. सदिच्छा एकटी होती. ती समुद्राच्या दिशेनं जात होती. ती आत्महत्या करेल की काय, असा संशय आल्यानं मी तिच्या मागे गेलो. पण आत्महत्या करणार नसल्याचं तिनं मला सांगितलं. त्यानंतर आमच्यात चर्चा झाली. पहाटे साडेतीन वाजेपर्यंत आम्ही बँडस्टँडमधील खडकावर बसून होते. तिथं सेल्फी घेतल्यानंतर दोघेही तेथून निघून गेले, असं मिठ्ठू सिंगनं खोटे सांगून पोलिसांची दिशाभूल केली. मात्र मिठ्ठू सिंगला पोलिसी दट्ट्या दाखवून त्याची चौकशी केली. तेव्हा त्याने सदिच्छा साने हिची हत्या केल्याची कबुली पोलिसांजवळ दिली. मिथू सिंग हा वांद्रे परिसरात आपल्या आईवडिलांसह राहत होता. मिथूचा वांद्रे परिसरातील बँड स्टॅन्ड भागात मित्स किचन नावाचा फूड स्टॉल होता. फूड स्टॉलवर येणाऱ्या ग्राहकांसोबत सेल्फी घेऊन तो सोशल मीडियावर पोस्ट करत असे. त्यामुळे आपल्या फूड स्टॉलची प्रसिद्धी होते,असे त्याला वाटत असे.अशा प्रकारे अनेक जणांसोबत त्याने सेल्फी काढले होते .ते सेल्फी मिथूने पोलीस आणि सदिच्छा सानेच्या कुटुंबियांनाही दाखवले होते. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी सदिच्छा साने ही परीक्षेसाठी जाते म्हणून घरातून निघाली. सकाळी ९.५८ वाजता सदिच्छा विरार स्थानकातून लोकल ट्रेनमध्ये चढली होती. तिला दुपारी २ वाजता जे.जे. रुग्णालयात प्रिलिम परीक्षेला हजर राहायचं होतं. मात्र ती अंधेरी स्थानकावर उतरली आणि तिथून दुसरी लोकल ट्रेन पकडून ती वांद्रे स्थानकावर उतरली. तिथून रिक्षा पकडून बँडस्टँडला पोहोचली. याच ठिकाणी मिथू सिंगचा मित्स किचन नावाचा फूड स्टॉल आहे. या ठिकाणी दोघांची भेट झाली. या भेटी दरम्यान मिथू सिंह आणि सदिच्छा यांच्यात अचानक वाद झाला. सदिच्छाने मिथूच्या वागण्याबाबत आक्षेप घेत त्याच्याशी भांडण केले. रागाच्या भरात मिथूने तिला मागे ढकलले. यावेळी तिचे डोके दगडाला आदळले. त्यामुळे झटापटीत तिचा मृत्यू झाला. तिला ठार मारण्याचा कोणताही उद्देश नव्हता. सदिच्छाचा मृत्यू झाल्यानं मिथु घाबरला. मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने सदिच्छाचा मृतदेह लाइफ जॅकेटवर ठेऊन पाण्यात फेकून दिला. मात्र सदिच्छा घरी न परतल्याने तिचे कुटुंब चिंताग्रस्त झाले. तिच्या कुटूंबियांनी सदिच्छा हिचा शोध कुठेच लागत नसल्याने तिच्या कुटुंबीयांनी बोईसर पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. ती बेपत्ता होऊन १५ दिवस उलटल्यानंतरही तिच्याशी संपर्क होऊ शकला नाही, तेव्हा कुटुंबीयांनी तिच्या अपहरणाचा संशय व्यक्त केला होता. सदिच्छाचा शोध घेण्यासाठी छायाचित्र प्रसारित करण्यात आले होते. तिचा काहीच ठावठिकाणा लागत नसल्याने या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता. तांत्रिक पुराव्यांवरून तिचे शेवटचे ठिकाण वांद्रे बॅण्ड स्टॅन्ड येथे होते. त्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी वांद्रे पोलीस ठाण्यात धाव घेतली. गुन्हे शाखा कक्ष ९ ने याबाबत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासात सदिच्छाला शेवटचे जीवरक्षक मिथू सिंगने पाहिले होते. अखेर वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी सिंह व त्याच्या साथीदाराला अटक केली. याप्रकरणी चौकशीत त्यांनी सदिच्छा हिची हत्या केल्याची धक्कादायक कबुली दिली. त्यानंतर सदिच्छाचा मृतदेह शोधण्यासाठी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी नौदलाच्या मदतीने समुद्रकिनारी जाऊन पाहणी केली. परंतु सदिच्छाचा मृतदेह हाती लागला नाही. पोलिसांनी यादोघांविरुद्ध कलम ३६३ (अपहरण) आणि ३६४ (ई) (खंडणीसाठी अपहरण) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तब्बल दोन वर्षानंतर हा गुन्हा उघडकीस आला असला तरी अजूनही अनेक तर्क वितर्क लढवली जात आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## ५०० रुपयांचा वाद अखेर प्राणावर बेतला...

गॅरेजमध्ये सोडली होती. हैदरभाई याचे गॅरेज पुणे नाशिक महामार्गावर असून त्याच्या गॅरेजमध्ये राजुरी येथील मयुर अशोक सोमवंशी हा मेकॅनिक म्हणून काम करीत असल्याने त्याच्याकडे गोडसे यांची कुझर गाडी दुरूस्तीसाठी होती. विनायक गोडसे यांनी गाडी दुरूस्तीचा व्यवहार हा गॅरेजमालक हैदरभाई यांच्याशी ७६०० रूपयात केला होता. गेली महिनाभर गोडसे याची क्रुझर गाडी हैदरभाई यांच्या गॅरेजमध्ये होती. ती गाडी दरूस्त झाल्यानंतर हैदरभाई यांनी मयुर सोमवंशी याला गोडसे याच्याकडून पुर्ण बील घेऊनच गाडी त्याचेकडे दे. उधारी किंवा मागे काही पैसे ठेवू नकोस अशी सुचना केली होती. मालकांनी केलेली सुचना सोमवंशी याने गोडसे यांना सांगितली. गोडसे हे ज्यावेळी गाडी नेणेसाठी आले त्यावेळी त्यांनी गाडीची ट्रायल बघितली. त्यांना कशात तरी खटकत होते. त्याच्या मनासारखी गाडी दुरूस्त झाली नव्हती. कुठून तरी गाडीचा आवाज येत होता. त्यांनी ही गोष्ट सोमवंशी याला सांगितली. सोमवंशी याने काही ही चुक राहिली नाही. गाडी व्यवस्थीत दुरूस्त झाली आहे असे सांगितले परंतु गोडसे याना ते मान्य नव्हते. ते त्याला परत परत गाडीचा कुठून तरी आवाज येतोय, ते करून दे. असे सांगत होते. पण सोमवंशी याला ते मान्य नव्हते. त्याच्या मते गोडसे हे मुद्दामच काही तरी खेकटे उकरून काढत आहेत आणि आपल्याला मुद्दामच त्रास देत आहेत असे त्याला वाटत होते. गाडी नेताना गोडसे यांनी सोमवंशी याला ७१०० रूपये दिले. ठरलेल्या व्यवहारात त्यांनी ५०० रूपये कमी दिल्याने मयुर सोमवंशी हा त्याचेवर भडकला होता. तो त्यांना मी ५०० रूपये कमी घेणार नाही कारण मालकाने मला पैसे कमी घेवू नकोस असे बजावले असल्याचे सांगितले. तरी ही विनायक गोडसे हे काही ऐकत नव्हते. त्यांनी ५०० रूपये कमी देवून तेथून काढता पाय घेतला. दुसऱ्या दिवशी मालक हैदरभाई यांनी मयुर याला तु पैसे कमी का घेतलेस अशी विचारणा करून तुझ्या पगारातून मी ५०० रूपये कट करणार बघ असे सांगितले.खरे तर यात मयुरचा काहीच दोष नव्हता. गोडसे यांनीच ठरलेल्या व्यवहारात ५०० रूपये कमी दिले होते. त्याला वाटले मालक काही बोलणार नाहीत. कारण मालक हैदरभाई आणि गोडसे हे चांगले मित्र ही होते.त्याची सारखी उठबस ही होत होती. परंतु तरी ही हैदरभाई यांनी मयुरला ५०० रूपयासाठी जबाबदार धरले होते. ही गोष्ट मयुरच्या मनाला लागलेली होती. तसा तो रागीट आणि तापट स्वभावाचा होता.तो कोणाचे काही बोलून घेणारा नव्हता. आपले राहिलेले ५०० रूपये गोडसे याच्याकडून कसल्या ही परिस्थीतीत वसुल करायचेच असे ठरविले. त्यासाठी तो गोडसे यांना त्याच्या मोबाईलवर सारखे फोन करून ५०० रूपयाची विचारणा करू लागला होता. हे पाचशे रूपये गोडसे याच्यासाठी काही जास्त नव्हते. पण ते पैसे देण्यासाठी मयुरला मुद्दामच टाळत होते. कारण या पैशासाठी मयुरने त्यांना फोनवरून शिव्या घालून नको नको ते बोलले होता. तू तुझ्या मालकाला सांग मी ५०० रूपये देत नाही. बघू त्याचे काय करायचे असे ते त्याला म्हणाले होते. मयुरने गोडसे यांना शिवीगाळ केली असल्याने त्याना त्याचा राग आला होता.कुठला कोण आणि मला ५०० रूपयासाठी तगादा लावत आहे असे म्हणून त्यांनी तो विषयच बाजुला ठेवलेला होता. त्यातच मंगळवार दि.२४ जानेवारी २०२३ रोजी मयुरने गोडसे यांना फोन करून तुम्ही ५०० रूपये दया म्हणून फोन केला.गोडसे यांनी पैसे देण्यास नकार दिल्यावर तुम्ही गॅरेजवर याच तुम्हाला बघून घेतो असे म्हणत त्याला शिवीगाळ केली. मयुरने बघून घेण्याची भाषा केल्याने गोडसे हे चांगलेच भडकले होते. मी आताच तुझ्याकडे येतो काय करणार आहेस ते बघतोच असे म्हटले.ते लागलीच आळेफाटा येथून पुणे नाशिक महामार्गावरील हैदरभाई याच्या गॅरेजवर आपले मित्र सचिन भिमाजी जाधव याच्याबरोबर दोन चाकींगाडीवरून आले. त्यावेळी रात्रीचे ८ वाजले होते. मयुर आणि गोडसे या दोघात या विषयावरून चांगलीच खंडाजंगी जुंपली होते. दोघे ही तावातावाने बोलत होते. गोडसे हे गाडी व्यवस्थीत दुरूस्त झाली नसल्याचे सांगत होते. तर मयुर हा मी चांगले काम केले आहे तुम्ही मुद्दामच काही तरी खेकटे काढत आहे असे म्हटल्यावर गोडसे हे मयुरच्या अंगावर मारायला त्याचे अंगावर जावू लागले. त्याचवेळी मयुर हा सावध असल्याने त्याने आपल्या कडील चाकू काढून विनायक गोडसे यांच्या छातीवर मानेवर आणि मांडीवर सपासप वार केले. हे बघून गोडसे याचा मित्र जाधव हे त्याला सोडवायला गेल्यावर मयुरने त्याला ही चाकूचा धाक दाखविला.त्यामुळे तो तेथून बाजला सरला. मयुरने चाकूने वार केल्याने विनायक गोडसे हे रक्ताच्या थारोळ्यात पडले. काही क्षणातच त्याचा जागीच मृत्यू झाला. हे बघून मयुर हा भानावर आला.त्याला आपल्या हातून खून झाला आहे हे समजातच त्याने त्याच चाकूने स्वत:वर ही वार करून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.त्याने स्वत:वर वार केल्याने तो ही गंभीर जखमी झाला होता. या घटनेची माहिती सचिन जाधव याने आळेफाटा पोलीसांना दिली.या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने मिळताच पोलीस ही गॅरेजवर आले. त्यांनी जखमी मयुर सोमवंशी याला तातडीने उपाचरासाठी दवाखान्यात दाखल केले. त्यानंतर पोलीसांनी या घटनेची माहिती घेत या घटनेची माहिती मयत विनायक उर्फ संतोष गोडसे याच्या घरच्या लोकांना दिली. घटनास्थळी मोठी बघ्यांची गर्दी झाली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे व कुणी केली आहे याची माहिती पोलीसांना मिळाली होती.

या घटनेची लेखी फिर्याद या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार सचिन भिमाजी जाधव याने आळेफाटा पोलीसांत दिल्याने पोलीसांनी विनायक उफ संतोष बबन गोडसे वय (४२) रा.पिंपळवाडी याच्या खून प्रकरणी मयुर अशोक सोमवंशी (वय २५) रा.राजुरी याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,५०४, ५०६,५०७ प्रमाणे गुन्हा दाखल केला. या घटनेत मयुर हा गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी दवाखान्यात दाखल केलेले असल्याने दवाखान्यातील उपचारानंतर पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले.त्याचेकडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. पोलीसांनी त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला.या घटनेचा पुढील तपास पो.निरी. यशवंत नलावडे हे करीत आहेत. व्यवहार हा व्यवहारच असतो त्यात कमी जास्त करता येत नाही ठरलेल्या व्यवहारात कमी केले की त्यात कठूता येत असते आणि ते समोरच्या माणसाला खपत ही नसते. गोडसे यांनी ठरलेले ५०० रूपये दिले असते तर मयुर आणि त्याचे भांडण झाले नसते.पण या व्यवहारी जगात जर तर ला थारा नसल्याने अशा घटना या घडत असतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## प्रियकरासाठी तिचे मन अधीर झाले...

याची ती दुसरी पत्नी असल्याने त्याला फारसी किंमत देत नव्हती. याचाच फायदा घेत तिने रवी माने बरोबर सुत जमविले होते. रवी हा देखील विवाहित असल्याने तो ही लीनाच्या प्रेमात वाहवत चालला होता. त्याला तिने असे काही खुळ लावले होते की तो तिला सोडू इच्छित नव्हता. दोघांच्या विवाहबाहय संबंधाची चर्चा परिसरात होऊ लागल्याने नितीन याची अब्रु वेशीला टांगली गेली होती. लीना ही सांगून ही ऐकत नसल्याने तो ही त्रस्त झाला होता. दररोज रात्री दारू पऊन येवून तिला या संबंधातून तो मारहाण शिवीगाळ करू लागल्याने लीना ही देखील वैतागलेली होती. या संबंधात तिला पतीपेक्षा प्रियकरच भारी वाटत असल्याने ती त्याला सोडत नव्हती. पतीचा मार खाणार पण रवीबरोबर संबंध ठेवणार अशी तिची गत झाली होती.

पत्नीच्या बाहेरख्याली स्वभावाने नितीन हा बेजार झाला होता.त्याला बाहेर तोंड दाखवायची देखील लाज वाटत होती. तिच्यामुळे आपली इज्जत अब्रु जात आहे म्हणून तो तिला मारहाण करून शिवीगाळ करीत मानसिक आणि शारीरिक त्रास देत होता. त्याचा त्रास खूपच वाढल्यावर लीना ही देखील त्याच्या या त्रासला कंटाळली होती. अखेर तिने प्रियकर रवी माने याला भेटून आपल्या संबंधात आपल्या नवऱ्याचा अडसर ठरत आहे.त्याला आपल्या मार्गातून बाजुला कर. तरच माझ्याकडे ये.असे सांगितले. त्याला ही ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तिने सांगितलेली गोष्ट तो करायला एका पायावर तयार झाला. त्याने प्रियेसी लीना पडवळे हिचा पती नितीन पडवळे याचा कायमचा काटा काढण्याचा प्लॅन आखला आणि यातूनच पश्चिम महाराष्ट्रला हादरवून सोडणारी मर्डर मिस्ट्रीची घटना घडली.नितीन याला सांपविण्याची सुपारी त्याने मित्र दीलीप दुधाळे याच्या मार्फत अमित शिंदे याला गाठले.त्याला नितीनच्या हत्येची सुपारी त्याने दीड लाख रूपयात दिली. सन २०११ मध्ये त्यांनी त्याच्या हत्येचे नियोजन केले. रवी माने व दिलीप दुधाळे यांनी नितीनच्या हत्येची पूर्व तयारी करण्यासाठी म्हणून शहरातील एका मध्यवर्ती हॉटेलमध्ये अमित शिंदे आणि त्याच्या साथीदारांची बैठक दुपारी १२.३० वाजता घेतली. त्या हॉटेलात त्यांनी खान पान करून नितीनच्या हत्यचे नियोजन केले. त्यावेळी अमित शिंदे याने हत्येच्या नियोजनासाठी आपल्या ओळखीची गितांजली मेनशी या महिलेची मदत घेण्याचे ठरविले. तिचे आणि अमति शिंदे याचे संबंध असल्याने ती ही या बैठकीला हजर होते.तसे ती लीनाला देखील ओळखत असल्याने ती नितीन पडवळे याला देखील ओळखत होती. या हत्येला मुर्त रूप देण्यासाठी अमित शिंदे याने तिच्यावर एक जबाबदारी टाकली. अमित शिंदे याने सांगितल्या प्रमाणे तिने घटनेच्या दिवशी म्हणजे १२ जानेवारी २०११ रोजी सायकांळी गितांजली मेनशी हिने नितीन याच्याशी फोनवरून संपर्क करून एक काम आहे तुम्ही मला आर.के.नगर परिसरातील खडीचा गणपती येथे बोलावून घेतले. तिने बोलविल्यावर नितीन हा तेथे आपल्या दुचाकी गाडीवरून तेथे आला. ती त्याचेबरोबर प्रेमाचे नाटक करीत त्याची पत्नी लीनाचा विषय काढून तिच्या विषयी त्याला उलट सुलट सांगत होती. ते दोघे बोलत थांबले असताना अचानक ठरलेल्या प्लॅनप्रमाणे एका मोटारीतून अमित शिंदे, सतिश वडर, दिलीप दुधाळे, आकाश वाघमारे, किशोर माने, विजय शिंदे याचेसह आणखीन तीन चार जण एका मोटारीतून तेथे आले. गितांजली बरोबर बोलत थांबलेल्या नितीन याला गाडीतून उतरून अमित शिंदे यांने आपल्याकडील हॉकीच्या स्टिकने मारहाण करायला सुरूवात केली.यावेळी तेथे रवी माने आणि त्याची प्रियेसी लीना हजर नव्हते. त्यांनी त्यांना सुपारी दिली असल्याने त्याचे काम झाले होते. अमित शिंदे याने नितीन याला मारहाण करीत खाली पाडले. त्याच्या डोक्यातून तोंडातून रक्त येवू लागले होते.खाली पडलेल्या अमित शिंदे याच्या मित्रांनी त्याच अवस्थेत नितीन याला उचलून आपल्या मोटारीत टाकले. त्यानंतर ते वाठार, कोडोली, वारणानगर, बोरपाडळे, बांबवडे, मलकापुर आंबा घाट मार्गे वाघझरे येथील मानोली जंगलात आले. तेथे त्यांनी रात्रीच्या अंधारात नितीन याला गाडीतून उतरून एका दरीच्या जवळच्या दगडावर बसविले. अमित शिंदे आणि त्याच्या साथीदारांनी नितीन याचे हात पाय दाबून धरले. त्याचवेळी अमित शिंदे याने नितीन याचे डोके आपल्या काखेत धरले आणि आपल्या कमरेला लावलेला चॉपर काढून नितीन याचा गळा चिरला. त्याचे शीर धडापासून वेगळे केले. ते शीर त्याने एका प्लास्टिक पिशवीत ठेवले. तर त्याच्या साथीदारांनी नितीन याचे धड जवलच असणाऱ्या दरीत टाकले. त्याचे काम तमाम केल्यावर अमित शिंदे याने रवी माने याच्याशी संपर्क करून त्याला वारणानगर येथे येण्यास सांगितले.रवी माने हा वारणानगर येथे आल्यानंतर अमित शिंदे याने नितीन पडवळे याचे प्लास्टिक मध्ये भरलेले शीर दाखविले.रवी याला ही नितीनच्या हत्येची खात्री पटली. त्याने अमित शिंदे याला नितीन याचे शीर, त्याची मोटार सायकल, त्याचा मोबाईल, कॅरीबॅग, बेसबॉल, आणि हॉकीची स्टिक याची विल्हेवाट लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे अमित शिंदे आणि त्याच्या साथीदारांनी या सगळ्या गोष्टीची विल्हेवाट वारणानगर परिसरातील एका निर्जन स्थळी लावली. इकडे दुसऱ्या दिवशी ठरल्या प्रमाणे लीना हिने शाहूपुरी पोलीस स्टेशन गाठून पती नितीन पडवळे हे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना जिल्हयातील शाहूवाडी पोलीसांनी पाच सहा दिवसांनी मानोली जंगलातील एका दरीत शीर नसलला धड मिळाले होते. त्याचप्रमाणे कोडोली पोलीसांना वारणानगर परिसरात एका निर्जन स्थळी प्लास्टिकच्या बॅगेत एक शीर मिळाले होते. जिल्हयात एकाच वेळी धड आणि शीर मिळून आल्याने एकच खळबळ उडाली होती. शाहूवाडी पोलीस स्टेशनचे त्यावेळचे पो.निरी.डी.एस. घोगरे यांनी योग्य तपास करून या धड नसलेल्या मृतदेहाची ओळख पटवून या गुन्हयाचा छडा लावला होता. यातील नितीन पडवळे याची दुसरी पत्नी लीना पडवळे हिला ताब्यात घेऊन तिच्याकडे या घटने संर्दभात विचारणा केली असता तिने आपले विवाह संबंध मान्य करून पतीची हत्या प्रियकर रवी माने याने दीड लाख रूपयांची सुपारी देवून केल्याचे सांगितले. पो.निरी. डी.एस. घोगरे यांनी तपास करून यातील आठ ते दहा संशयीतांना ताब्यात घेऊन त्याचे विरूध्द गुन्हा दाखल करून या संशयीतांच्या विरोधात कोल्हापूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. दरम्यान या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी अमित शिंदे याचा गडमुडशिंगी जवळ खून झाला.तर या घटनेतील अन्य दोन आरोपी सतीश भिमसिंग वडर आणि इंद्रजित उर्फ चिल्या रमेश बनसाडे हे अदयाप ही फरार आहेत. जिल्हा व सत्र न्यायालय क्र.३ येथे ही केस न्यायाधिश एस.एस.तांबे याच्या कोर्टात तब्बल १२ वर्ष चालली. या खटल्यात सरकारी वकिल ॲड.समीउल्ला पाटील यांनी काम पाहिले. सरकारी पक्षातर्फे एम एस. पाटील यांनी २१ साक्षीदार तपासले होते.या खटल्यात पंच वैदयकीय अधिकारी यांच्या साक्ष महत्वपुर्ण ठरल्या. या खटल्याचा निकाल जिल्हा व सत्र न्यायालय क्र.३ एस.एस. तांबे यांनी देताना यातील मुख्य संशयीत आरोपी लीना नितीन पडवळे (वय ४०) रा. लाईन बाजार,तिचा प्रियकर रवी रमेश माने (वय ३७) रा. माकडवाला वसाहत,विजय रघुनाथ शिंदे (वय ४१) रा. नालासोपरा जि. पालघर, किशोर दोडाप्पा माने (वय ३३) रा. साळोखे पार्क, आकाश उर्फ अक्षय सीतराम वाघमारे (वय ३०) रा. राजारामपुरी दिलीप व्यकंटेश दुधाळे (वय ३९) रा. माकडवाला वसाहत, गितांजली विरूपाक्ष मेनशी (वय ४०) रा. शांतीनगर, महेश सब्बान कुचकोरवी (वय ४१) रा, माकडवाला वसाहत यांना जन्मठेप आणि प्रत्येकी १० हजार रूपयांचा दंड ठोठावला. यातील मुख्य रवी माने याच्या सह त्याच्या नातेवाईकांनी न्यायालयाच्या अवारात मोठी गर्दी केली होती. संशयीतांना वैदयकीय तपासणीसाठी बंदोबस्तात नेण्यात आले. या घटनेचा कोणताही परिणाम होऊ नये म्हणून खरदारीचा उपाय म्हणून पोलीसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. न्याय देवता आंधळी असते असे म्हटले जाते. परंतु ज्यावेळी न्यायदेवता न्याय देते त्यावेळी भल्या भल्यांना चपराक बसते आणि गुन्हेगार कितींही चालाख असले आणि हुशार असले तरी पोलीस मेलेले मडे देखील उकरून काढून त्याचेकडून गुन्हा वदवून घेतात. या घटनेतील मुख्य आरोपी अमित शिंदे याचा खून झाल्याने व यातील दोन आरोनी फरार असल्याने या घटनेला वेगळे वळण लागण्याची शक्यता होती. पण पुरावे आणि साक्षीदार यांची साक्ष हे या खटल्यात महत्वपुर्ण ठरल्या हे वेगळे सांगण्याची गरज राहिली नाही.विवाह बाहय संबंधात पत्नी जर भरकटली तर ती आपल्या नवऱ्याचा काटा काढण्यासाठी कोणत्या थराला जाते हेच या घटनेवरून दिसून येते.

# शिक्षकांवर अन्याय करणाऱ्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीला मत मागण्याचा नैतिक अधिकार नाही -पालकमंत्री गिरीष महाजन



लातूर/प्रतिनिधी

ज्ञानदान होणाऱ्या पवित्र शिक्षण क्षेत्राचा वापर केवळ राजकारणासाठी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी केला आहे. गुरूजनांना शिक्षण सेवक हे पद काँग्रेस राष्ट्रवादीनेच दिलेले असुन शिक्षकांच्या पेन्शन योजनेसह विना-दानित शाळेचा प्रश्न त्यांचाच काळात प्रलंबित राहिला होता. शिक्षण क्षेत्राचे वाटोळे केले निवडणुकीच्या निमित्ताने त्यांच्याकडुन प्रश्न सोडविले जावेत अशी ओरड होवू लागली आहे. सत्तेच्या काळात प्रश्नाची सोडू नको करू न शकणाऱ्या आणि शिक्षकांवर अन्याय करणाऱ्या महाविकास आघाडीला मतदान मागण्याचा नैतिक अधिकारी नाही अशी घणाघाती टिका राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा लातूर जिल्हयाचे पालकमंत्री गिरीष महाजन यांनी केली आहे. लातूर येथे छत्रपती संभाजीनगर विभाग शिक्षक मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार प्रा. किरण पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित संस्थाचालक व शिक्षकांच्या मेळाव्यात पालकमंत्री महाजन बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड, खा. सुधाकर श्रृंगारे, आ. अभिमन्यू पवार, शहर जिल्हाध्यक्ष गुरूनाथ मगे, प्रदेश उपाध्यक्ष विनायकराव पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर भालेराव, माजी आ आमदार गोविंदण्णा केंद्रे, शिवाजीराव पाटील तळेकर, प्रदेश कार्यकारणी सदस्य शैलेश लाहोटी, प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, किसान मोर्चाचे दिलीपराव देशमुख, दिग्विजय काथवटे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रासह देशातील शिक्षण क्षेत्रात क्रांतीकारक बदल होवू लागलेले असुन ज्याच्याकडुन भावी पिढी घडविण्याचे काम होवून देशाचे भविष्य अधिक उज्वल होत आहे. त्या शिक्षकांचा मानसन्मान वाढविण्याचे काम होत असल्याचे सांगून पालकमंत्री गिरीष महाजन म्हणाले की, देशाला महासत्ता बनविण्यात शिक्षकांचे मोठे योगदान लाभत आहे त्या शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकार बाधिल असल्याचा विश्वास दिला. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्याबाबत कधीच पक्षीय व राजकीय मतभेद केला जाणार नाही असे सांगून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी आणि प्रत्येकाला शिक्षण मिळावे याकरीता राज्य सरकार प्रयत्नशील आहे. मात्र हे प्रयत्न होत असताना शिक्षकांनाही त्यांचा सन्मान मिळावा आणि त्यांचे प्रश्न सुटले जावेत याकरीता राज्य सरकारच्या वतीने मोठी आर्थिक तरतूद करण्यात येत असल्याचे गिरीश महाजन यांनी सांगितले. पुढे बोलताना महाजन म्हणाले की ज्यानी हे प्रश्न निर्माण केले तेच आता हे प्रश्न सोडविण्यासाठी ओरड करू लागलेले आहेत. शिक्षण सेवक पद त्यांच्याच सत्ता काळात निर्माण झालेले असुन विनाअनुदानित धोरणही त्यांनीच आणलेले आहे. या धोरणामुळे शिक्षकांचे वेतन बंद झाले मात्र हे वेतन सुरू करण्याचे काम २०१६ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले ते पुन्हा २०१९ मध्ये ठाकरे सरकारने बंद केलेले आहे. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकार शिक्षकांचे आणि शिक्षण क्षेत्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी मोठया प्रमाणात आर्थिक तरतूद करत आहे ही आर्थिक तरतूद भविष्याची गुंतवणूक असुन या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्यास प्राधान्य मिळणार आहे. ज्यानी शिक्षण क्षेत्रासह शिक्षकांचे नुकसान केले त्यांना मतदान मागण्याचा अधिकारी नाही अशी टिका करून गिरीश महाजन म्हणाले की आगामी काळात शिक्षकांचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी डबल इंजिन सरकारचे प्रतिनिधीत्व करणारे प्रा. किरण पाटील यांना प्रथम पसंदीचे मतदान देवून आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या हक्काचा उमेदवार सभागृहात पाठवावा असे आवाहन केले. केंद्र व राज्यातील सरकारच्या माध्यमातून आपण शिक्षकांचे अनेक प्रश्न मार्गी लावण्याचे काम केलेले आहे. विनाअनुदानित शिक्षकांचा प्रश्न, भरतीचा प्रश्न यासह पेन्शनचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन सकारात्मक पध्दतीने काम करीत असल्याचे सांगत माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी यापुढील कालावधीतही उर्वरित शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रा. किरण पाटील यांच्यासारख्या कार्यकर्त्याच्या पाठीशी सक्षमपणे उभे रहा. प्रा.किरण पाटील हे आपल्याकडे कर्ज मागायला आले आहेत. त्यांच्या या कर्जाचे जामीनदार आम्ही सर्वजण असुन त्यांना मतदानरूपी कर्ज देण्याचे काम आपण सर्वांनी करावे त्या मतदानरूपी कर्जाची व्याजासह परतफेड करतील. तेव्हा प्रा. किरण पाटील यांच्या पाठीशी सक्षमपणे उभ रहा असे आवाहन माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले. प्रारंभी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मग्गे यांनी प्रास्ताविक केले यावेळी जिल्हाभरातील संस्थाचालक शिक्षक मतदार भाजपचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रमजीवी जनता क्लिनिक मार्फत अंबाडीतील स्थलांतरित मजुरांची आरोग्य तपासणी व उपचार

विरार/प्रतिनिधी



प्रजासत्ताक दिनाचे औचत्य साधून श्रमजीवी जनता क्लिनिक मार्फत श्रमजीवी संघटना आणि समर्पण फाऊंडेशन यांच्या सोबतीने स्थलांतरित मजुरांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. अंबाडी येथील तब्बल २८४ मजुरांनी या शिबिराचा लाभ घेतला. गेले सहा महिने प्रमोद पवार मित्र परिवार संचालितश्रमजीवी जनता क्लिनिक हे गरीब सामान्य आणि स्थलांतरीत रुग्णांसाठी संजीवनी ठरत असल्याचे गौरोद्गार गणेशपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धर्मराज सोनके यांनी यावेळी काढले. श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक भाऊ पंडित यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या या क्लिनिक मध्ये केवळ २ रुपयांत उपचार आणि औषधं उपलब्ध आहेत. जव्हार मोखाडा डहाणू या दुर्गम आदिवासी तालुक्यांतून अंबाडी नाका येथे मोठ्या प्रमाणात मजूर बांधव रोजगारासाठी स्थलांतरीत होत असतात. यावर्षी ही संख्या मोठ्या प्रमाणात आहे. याच अंबाडी नाक्यावर श्रमजीवी जनता क्लिनिक दररोज २ रुपयांत सेवा देत आहे. मात्र आज प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून तज्ञ डॉक्टर्स मार्फत या मजुरांची आरोग्य तपासणी करण्यात आली. दिवसभरात २८३ रुग्णांना उपचार मिळाले. यात महिला मोठ्या प्रमाणात होत्या.

या रुग्णांना तपासणी आणि दर्जेदार औषधं अगदी मोफत देण्यात आली. समर्पण फाऊंडेशन चे प्रमुख आणि स्त्रीरोग तज्ञ आणि बाल विकार तज्ञ डॉ.विनय पाटील, नवजीवन हॉस्पिलच्या डॉ. वर्षा पाटील, श्रमजीवी जनता क्लिनिकच्या डॉ.पल्लवी जाधव, सेवाभावी भावनेतून नेहमीच कुपोषण निर्मूलन मोहिमेत हातभार लावणारे डॉ. मोहित पाटील तसेच डॉ.नम्रता पवार या सर्वांनी रुग्णांना उपचार दिले. तर श्रमजीवी जनता क्लिनिक संचालक टीम प्रमोद पवार, मिलिंद कांबळे, कल्पेश (बाळू) जाधव, रुपेश जाधव, ॲड. सोनाली पवार, ॲड. दिनेश जाधव, ॲड. रोहित पाटील, ॲड.असगर पटेल, भूषण घोडविंदे, महेश ठाकरे, मुकेश पाटील, निलेश चव्हाण, नवनाथ भोये, प्रशांत चौधरी, सुशांत चौधरी, अजय तनपुरे, गवेश भोईर, मनोज पाटील, कृपेश मानकर, सागर न्हानवे, सुभाष राठोड, प्रणव पानवे, संकेत राठोड, भूषण जाधव, प्रमोद ठाकरे, प्रफुल्ल हिरे, इत्यादी तरुणांनी परिश्रम घेतले. श्रमजीवीच्या सुशीला आत्रम यांनी विशेष परिश्रम घेतले. नवजीवन हॉस्पिटल मधील सर्व नर्सिंग स्टाफ ने महत्वाची भूमिका बजावली. या शिबिरात डॉ.समीर खिस्मतराव, डॉ.माधव कावळे, श्रमजीवीचे तालुका अध्यक्ष सुनील लोणे, उपाध्क्ध्यक्ष नारायण जोशी, सचिव आशा भोईर, लक्ष्मी मुकणे, यशवंत भोईर, बाबुराव जाधव, यांनी सहभाग घेतला तर पालघर जिल्ह्याचे श्रमजीवी जिल्हा सरचिटणीस तथा जिल्हा परिषद सदस्य गणेश उंबरसडा, दीपक खंडागळे, सुजित घरत आदींनी शिबिराला भेट देत शुभेच्छा दिल्या.

# बिएनएन महाविद्यालयात राष्ट्रीय बालिका दिन उत्साहात साजरा



भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडीतील बिएनएन महाविद्यालयात केम स्टार सायन्स क्लब व महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय बालिका दिन मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी बिएनएन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य तथा केमिस्ट्री विभाग प्रमुख डॉ. के.एन.पाटणकर- जैन, जैष्ठ संशोधक प्रा.डॉ दिलीप काकविपुरे, भिवंडी मनपा उपायुक्त प्रणाली घोंगे, सहआयुक्त प्रीती गाडे, मनपा पर्यावरण विभाग प्रमुख नितेश चौधरी, पत्रकार नितीन पंडित, शरद भसाळे, केमिस्ट्री विभागाचे प्रा.पुंडलिक वारे व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी स्त्री पुरुष समानता, स्त्रियांचे लैंगिक व सामाजिक शोषण, कौटुंबिक हिंसा, स्त्री भ्रूण हत्या, हुंडा पद्धती, बालिका व महिला सुरक्षितता व शिक्षण आदी मुद्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बिएनएन महाविद्यालयाच्या मुलींनी महिला सक्षमीकरण, स्त्रीसमानता व स्त्री भ्रूणहत्या रोखण्या संदर्भात जनजागृती करणारे पोस्टर व चित्रांचे सादरीकरण केले, तसेच फेस आर्ट द्वारे कार्यक्रमाची माहिती दिली, त्याचबरोबर विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या महिलांचे पेहराव करत त्यांच्या कार्याची माहिती दिली. त्याचबरोबर कवितेच्या माध्यमातून देखील महिला सक्षमीकरणासंदर्भात माहिती दिली.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.सागर सानप यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा.प्रियंका जाधव यांनी केले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात मशाल रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत!

लातूर/प्रतिनिधी



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, आजादी का अमृत महोत्सव समिती, लातूर जिल्हा आणि भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव समिती, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृत महोत्सवानिमित्त आज महात्मा बसवेश्वर महाविद्यालयांमध्ये मशाल रॅलीचे आगमन झाले. यामध्ये सहभागी असलेल्या सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे उस्फुर्त स्वागत महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे यांच्या शुभ हस्ते पुष्पवृष्टी करून करण्यात आले. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांतप्पा उटगे, सदस्य अशोकप्पा उपासे, प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, लातूर जिल्हा आजादी का अमृत महोत्सव समितीचे सदस्य डॉ.भास्कर नल्ला रेड्डी, भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव समिती समन्वयक डॉ.संजय गवई, रॅली सहभागी मार्गदर्शक डॉ.गौरव जेवळीकर, डॉ.साईनाथ उमाटे, डॉ.किरण गुट्टे, डॉ. कल्याण सावंत, डॉ.सुदर्शन पेंडगे, सहभागी विद्यार्थी आदित्य गायकवाड, बिरादार महालसंकत, मारोती बिरादार, महादेव हळ्ळाले, विजय काळगे, अनिकेत वाघमारे, टेकाळे सुरेश, सुदर्शन सोनटक्के, नागमूळे श्रीनिवास आणि चंद्रकांत तेलंगे यांची उपस्थिती होती. या मशाल रॅलीचे उद्घाटन दि.२० जानेवारी २०२३ रोजी पानगाव येथे शहीद बालाजी माले स्मारक येथे झाले. त्यानंतर लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात जाऊन सामूहिक शपथ आणि चित्र प्रदर्शनाने प्रबोधन करून राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली. आज महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सभागृहामध्ये प्रबोधनपर कार्यक्रम सुद्धा घेण्यात आला. यावेळी सहभागी मार्गदर्शक प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचा महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे यांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.साईनाथ उमाटे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मौने मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा आजादी का अमृत महोत्सव समितीद्वारा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मशाल रॅलीला संपूर्ण जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मशाल रॅली आणि प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये राष्ट्र अभिमान आणि राष्ट्रभक्ती निर्माण केली जाते असे ते म्हणाले. डॉ.सुदर्शन पेंडगे यांनी सर्वांना शपथ दिली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयांमध्ये विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम सर्वांच्या सहकार्याने आयोजित केले जातात. आज मशाल रॅलीचे स्वागत करण्याचा योग मला मिळाला त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संजय गवई यांनी केले तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव समिती आणि क्रीडा विभागातील प्राध्यापक, बालाजी डावकरे, अशोक शिंदे, शुभम बिराजदार, श्रीकृष्ण बडगिरे, सय्यद जलील, महादेव कोरे आणि विद्यार्थी यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा जिजाऊ-सावित्री पुरस्काराने सन्मान!



## प्रभागातील ३००० पेक्षा जास्त महिलांकरिता हळदी कुंकूचा कार्यक्रम

उल्हासनगर/प्रतिनिधी

उल्हासनगरमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना -महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना यांच्या हस्ते समाजच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या हिरकणींचा गौरव व पुरस्कार जिजाऊ -सावित्री सोहळा आयोजित करण्यात आला.या सोहळ्याच्या निमित्ताने महिलांकरिता संस्कृतीक कार्यक्रम तसेच हळदी कुंकू व लक्की ड्रॉच आयोजन करण्यात आलं असून मोठ्या संख्येने महिलांचा सहभाग पाहायला मिळाला. उल्हासनगर कॅम्प - ५ हरि ओम नगर पोलीस वसाहत हिल लाईन पोलीस स्टेशनाच्या बाजूला महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना यांच्या वतीने उल्हासनगर मधील कर्तृत्वान महिलांचा सन्मान करून पुरस्कार देण्यात आला.दिक्षा मोतीराम तायडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार, सिमरन सिंग यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार, रुपाली साळवे यांना प्रशासकीय क्षेत्रातील पुरस्कार, ज्योती तायडे यांना महिला सक्षमीकरण तर वर्षा दवानी यांना वैद्यकीय क्षेत्रातील पुरस्कार देऊन नारीशक्तीचा सन्मान करण्यात आलाये.या सोहळ्याच्या निमित्ताने महिलांकरिता संस्कृतीक कार्यक्रम तसेच हळदी कुंकू व लक्की ड्रॉचं आयोजन करण्यात आलं होत. महाराष्ट्र नवनिर्माण कल्याण विभानसभा क्षेत्र संपर्क प्रमुख मनोज शेलार आणि समाजसेविका पूनम मनोज शेलार हे कार्यक्रमाचे आयोजक होते. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर अध्यक्ष बंधू देशमुख, गणेश आठवले, रवी अहिरे, सह असंख्य मनसे सैनिक कार्यक्रमाला उपस्थित होते.

# रेणा कारखान्याच्या शेतकी कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहनांचे वाटप



रेणापूर/प्रतिनिधी

येथील रेणा सहकारी साखर कारखाना येथे माजी मंत्री तथा रेणा कारखाना संस्थापक सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांच्या हस्ते शेतकी विभागातील कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहनांचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी आमदार त्र्यंबक भिसे, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष आबासाहेब पाटील, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे, व्हा.चेअरमन अनंतराव देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, संतशिरोमणी कारखाना व्हा.चेअरमन शाम भोसले, पंडीतराव माने, मांजरा कारखाना संचालक ज्ञानेश्वर भिसे, सचिन दाताळ, संग्राम माटेकर, प्रविण पाटील, तानाजी कांबळे, सतीश पाटील, स्नेहलराव देशमुख, युनीकॉर्न मोटार सायकल कंपनीचे प्रतिनिधी रवि जाधव, कार्यकारी संचालक बी. व्ही मोरे, मुख्य शेतकी अधिकारी एस. एस. भोसले, आदींची उपस्थिती होती. रेणा कारखाना यशस्वी वाटचालीत सर्व कामगार व कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांना योग्य सुविधा पुरविणे हे कर्तव्य संचालक मंडळाचे असून तसा प्रयत्न नेहमीच आमचा राहीला असून समन्वयातून शेतकरी सभासदांची उन्नती साधण्यासाठी आम्ही कटीबद्ध असल्याची भावना यावेळी सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांनी व्यक्त केली.

# भिवंडी शहरालगत खाडीपार येथे इमारतीचा भाग कोसळून एक ठार

भिवंडी : भिवंडी शहरातील धोकादायक इमारत दुर्घटनांचा प्रश्न जटील असताना शहरा लगतच्या खोणी ग्रामपंचायत हद्दीतील खाडीपाडी या भागात रस्त्यालगत असलेल्या मूलचंद कंपाऊंड येथे एका दोन मध्ये इमारती पुढील काही भाग कोसळल्याने झालेल्या दुर्घटनेत एक व्यक्ती ठार झाला आहे.पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास झालेल्या दुर्घटनेत इमारती लगत रस्त्या कडेला आठ दुकानाचे गाळे बनवण्यात आले होते. या दुकानां वरील स्लॅबचा भाग कोसळून ही दुर्घटना घडली असून यावेळी कपड्याचे दुकान असलेल्या गाळ्यामध्ये दुकानचालक माजिद अन्सारी वय २५ वर्ष हा झोपलेला असल्याने त्यावर इमारतीचा ढिगारा कोसळल्याने तो जागेवरच गतप्राण झाला. या दुर्घटनेची माहिती मिळतात भिवंडी अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी ढिगारा उपसून त्यामध्ये अडकलेले मृतदेह बाहेर काढून तो शासकीय रुग्णालयात रवाना केला आहे. दरम्यान त्या नंतर येथील शोधमोहीम थांबविण्यात आली आहे.

# बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृहात प्रजासत्ताक दिन साजरा



उल्हासनगर/किरण तेलगोटे

त्रिरत्न बौद्ध महासंघ संचलित बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृह गेल्या ३७ वर्षांपासून मोफत राहण्याची व्यवस्था आणि शैक्षणिक काम करत आहे.महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील सर्व जाती धर्मातील गरीब,गरजू, होतकरू विद्यार्थीना घडवण्याचं काम संस्था करत आहे.गेल्या ३७ वर्षात असंख्य विद्यार्थी ह्या संस्थेत शिकून गेली असून अनेक विद्यार्थीचं आयुष्य उज्वल झालं.बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृह म्हणजे यशस्वी विद्यार्थी घडवण्याचा कारखाना आहे असं बोललं जातं.प्रजासत्ताक दिनानिमित्त वसतिगृहात ध्वजवंदन आणि सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. चंद्रकांत साळवे (बालरोग तज्ञ) प्रमुख पाहुणे होते त्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.तर न्यझींलँड वरून वसतिगृहातील मुलांना भेटण्यासाठी आलेले.धम्मचारी अचल,विशाखा ताई, डॉ.गोकुळ अहिरे हे कार्यक्रमाचे विशेष पाहुणे होते.धम्मचारी अक्षयमती कार्यक्रमांचे अध्यक्ष होते.विद्यार्थ्यांनी खूपच सुंदर नृत्य सादर केलं, प्रासंगिक भाषण केल तसेच वसतीगृहात आयोजीत केलेल्या विविध स्पर्धेत एक ते तीन नंबर प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे सन्मान करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा मातोश्री वनमाला श्रीमंत गायकवाड आदर्श विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला. सुमित डोळस हा आदर्श विद्यार्थी म्हणून सन्मानित झाला.प्रमूख पाहुणे डॉ.चंद्रकांत साळवे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना विद्यार्थीना उच्च शिक्षणासाठी प्रेरित केले तसेच नेहमी आपला ध्येय ठरवून ते पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करावी. जीवनात ध्येय नसेल तर जीवन सुकान नसलेल्या नावे प्रमाणे भरकटलेलं असते. म्हणून जीवनात ध्येय असणे गरजेच आहे.यावेळी इतर ही उपस्थित पाहुण्यांचे मार्गदर्शन झालं. विद्यार्थ्यांचे पालक, माझी विद्यार्थी, स्थानिक केंद्रातील सदस्य आणि आसपास राहणारे लोक कार्यक्रमात उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन
आज़ादी का अमृत महोत्सव
G20

शांतीचा संदेश
ऐक्याची भाषा
समृद्ध भारत
विश्वाची आशा...



प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

एक पृथ्वी • एक कुटुंब • एक भविष्य
वसुधैव कुटुम्बकम्

श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR | महाराष्ट्र शासन | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन





विरार पूर्वेकडील कारगिल नगर येथील आर. के. अपार्टमेंट व माऊली अपार्टमेंट येथे प्रजासत्ता दिन साजरा करण्यात आला. यावेळी जय जवान मित्र मंडळाचे अध्यक्ष जहीर शेख यांच्या हस्ते झेंडा फडकविण्यात आला. यावेळी आर.के. अपार्टमेंटचे तसेच माऊली अपार्टमेंट मधील रहिवासी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. जहीर शेख यांच्याकडून लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनी विरार पोलीस ठाण्याच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक नागरीक, पत्रकार उपस्थित होते.





मीरा–भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील विरार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सुभाष गोयलकर यांना राष्ट्रपती शौर्य पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रजासत्ताक दिनी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

भावपुर्ण श्रद्धांजली

मृत्यू दिनांक २२ जानेवारी २०२३





स्व.दिपंकर अशोक पाटील
(बॉबी शेठ)
संस्थापक अध्यक्ष
केमिस्ट परिवार ऑफ न्युज
ठाणे व पालघर जिल्हा

दिशा डेव्हलपर्स विरार
दिशा रिक्षा चालक-मालक युनियन